रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | बुधवार । दि. २९ जुलै २०२६ । अंक ५३ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in



गुरुविन न मिळे ज्ञान,
ज्ञानाविन न होई समाधान...
जीवन भवसागर तराया,
चला, वंदू गुरुराया...
गुरुपौर्णिमेच्या
मंगलमय शुभेच्छा!

## सरकारच्या कृपेने भांडवलदार मस्त

# शेतकरी उद्ध्वस्त?



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रेवस-रेड्डी सागरी मार्गाच्या सुमारे २,४०० कोटींच्या प्रकल्पासाठी प्रस्तावित अलाईनमेंट बदलावरून अलिबाग तालुक्यात नवा वाद पेटला आहे. रेवस-चोंढी-अलिबाग-रेवदंडा या मूळ मार्गाऐवजी रेवस-हाशिवरे-कार्लेखिंड बोगदा-रेवदंडा हा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आल्याचा दावा केला जात असून, हा निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतल्याचे लोकप्रतिनिधींकडून सांगितले जात आहे. मात्र, याच दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी एक पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

### रेवस-रेड्डी महामार्गाच्या अलाईनमेंटमध्ये बदल?

### व्हायरल पोस्टने अलिबागमध्ये खळबळ

व्हायरल पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, मूळ प्रस्तावित मार्गावरील अनेक जमिनी वर्षांपूर्वीच मोठे बिल्डर्स, उद्योगपती आणि धनदांडग्यांच्या ताब्यात गेल्या आहेत. त्यामुळे अलाईनमेंट बदलाचा निर्णय हा खरोखर शेतकऱ्यांच्या हितासाठी होता की प्रभावशाली व्यक्तींच्या मालमत्ता वाचवण्यासाठी, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. दरम्यान, नव्या प्रस्तावित हाशिवरे-कार्लेखिंड मार्गावर आजही मोठ्या प्रमाणात आंबा, काजू आणि इतर बागायती क्षेत्र असल्याचा दावा पोस्टमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे एका भागातील शेतकऱ्यांचे •> पान २ वर

## वेधक

### अखेर काम बंद आंदोलन स्थगित

**रायगड :** मंडळ अधिकारी यांना करण्यात आलेली अटक बेकायदेशीर असल्याचा ठपका ठेवत जिल्ह्यातील महसूल कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून काम बंद आंदोलन सुरु केले होते. या आंदोलनाचा सर्वसामान्य नागरिकांना मोठा फटका बसला. दाखल्यांसह वेगवेगळी अनेक कामे या बंदमुळे रखडली. त्याचा प्रशासकीय कामावर मोठा परिणाम झाला. अखेर जिल्हाधिकारी यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर काम बंद आंदोलन स्थगित करण्यात आले. या बैठकीत वेगवेगळ्या •> पान २ वर

### आगीच्या भडक्यात विवाहिता भाजली

**रायगड :** मिळकतखार येथे चुलीवर स्वयंपाक करताना अचानक आगीचा भडका उडाल्याने २२ वर्षीय विवाहित महिला गंभीररित्या भाजली. या घटनेत महिला सुमारे ५० टक्के भाजल्याने तिला पुढील उपचारांसाठी मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, ही घटना अपघाती नसून, महिलेने स्वतःला पेटवून घेतल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केल्याने प्रकरणाचे गूढ वाढले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मिळकतखार येथील २२ वर्षीय विवाहित महिला सकाळी सुमारे नऊ वाजण्याच्या •> पान २ वर





## कृषीवल हेरगिरी

## अस्वस्थ चव्हाण साहेबांचा खुलासा

### प्रांताधिकाऱ्यांनीच न्यायालयीन प्रक्रियेवर उपस्थित केला प्रश्न?

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

किशोर शहा यांच्या भूसंपादन प्रकरणात मंडळ अधिकारी रविदास जाधव यांच्याविरोधात पोयनाड पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली. त्यानंतर न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडी आणि त्यानंतर न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयाच्या विचाराधीन असताना उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिलेल्या खुलाशामुळे नव्याने वाद निर्माण झाला आहे. पोलीस तपास सुरू असताना आणि न्यायालयाने कोठडीचा आदेश दिलेला असताना महसूल प्रशासनाकडून अशा प्रकारचे स्पष्टीकरण प्रसिद्ध करण्याची गरज काय होती, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. तपास यंत्रणा आणि न्यायालय त्यांचे काम करत असताना प्रशासनाला या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता का भासली?

#### कामबंद करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांनी प्रशासनाकडे कामबंद आंदोलनात सहभागी कर्मचाऱ्यांची गैरहजेरी नोंदवून नियमानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे. काहींनी अत्यावश्यक शासकीय सेवा बंद पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याचे आवाहन केले असून, कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचीही सूचना केली आहे.

अशीही चर्चा सुरू झाली आहे.

रविदास जाधव, रितेश पाटील, कुमार बैकर, रिया पाटील आणि सचिन ढवळे यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस यंत्रणा करत आहे, तर दोषी अथवा निर्दोष ठरविण्याचा अधिकार न्यायालयाचा आहे. अशा परिस्थितीत उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी माध्यमांमध्ये प्रसिद्ध •> पान २ वर

## ‘त्या’ विद्यार्थ्यांना तात्काळ सोडा

### सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र, राज्यांना आदेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नीट पेपरफुटीप्रकरणी झालेल्या आंदोलनानंतर दिल्लीसह भाजपशासित अनेक राज्यांमध्ये विद्यार्थ्यांविरुद्ध एफआयआर दाखल केले आहेत. सरकारने आश्वासन देऊनही यावर ठोस भूमिका न घेतल्याने विरोधी पक्षातील नेत्यांसह विद्यार्थ्यांनी सरकारवर हल्लाबोल केला. यानंतर या प्रकरणावर आता सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. देशभरात सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान अटक करण्यात आलेल्या १८ वर्षांखालील आणि कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सोडण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिले आहेत. •> पान २ वर

## भातशेती नष्ट करुन टोरंटचा रस्ता नको!

### पाच गावांतील ३९० शेतकऱ्यांचा विरोध




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

वर्षातून दोन वेळा भाताचे पीक घेऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीवरून टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडच्या जलविद्युत प्रकल्पासाठी रस्ता काढण्याच्या हालचालींना शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केला आहे. जमिनीचे दर शासनाने अद्याप निश्चित केलेले नसतानाच भूसंपादनाची प्रक्रिया पुढे नेली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. पाच गावांतील तब्बल ३९० शेतकरी या प्रक्रियेत बाधित होणार असून, बहुसंख्य शेतकऱ्यांनी जमिनी देण्यास हरकती नोंदवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वाढता विरोध टोरंटच्या प्रस्तावित •> पान २ वर

## ज्येष्ठ विधीज्ञ पारकर यांचे निधन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**




रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ फौजदारी विधीज्ञ ॲड. एम.एम. अर्थात महादेव उर्फ बाळासाहेब पारकर (७२) यांचे मंगळवारी (दि.२८) सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने विधी क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक अनुभवी, अभ्यासू मार्गदर्शक गमावल्याचे दुःख व्यक्त करण्यात आले आहे.

विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते स्व. ॲड. दत्ता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वकिलीची सुरुवात केली. ॲड. दत्ता पाटील यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनातून ॲड. पारकर यांनी कायद्याचा सखोल अभ्यास केला. •> पान २ वर







# संगममध्ये महावितरणचा बोजवारा?

## • वारंवार वीजखंडित होत असल्याने नागरिक त्रस्त

## • सामाजिक कार्यकर्ते महेश पेडणेकर आक्रमक

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील संगम परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. तक्रारी करूनही महावितरणकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते महेश पेडणेकर यांनी केला आहे. वीजपुरवठ्याच्या या प्रश्नावर पेडणेकर यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात वरिष्ठ कार्यालयासह ऊर्जामंत्र्यांकडे आणि ग्राहक मंचाकडे लेखी तक्रार करण्याचा इशारा दिला आहे.

पेडणेकर यांच्या म्हणण्यानुसार, संगम परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असून, येथे वारंवार वीजपुरवठा खंडित होतो. अनेकदा पहाटेपासून तासन्तास वीज नसल्याने नागरिकांना अंधारात राहण्याची वेळ येते. याबाबत महावितरणचे कनिष्ठ अभियंता दळवी तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना वारंवार माहिती देऊनही समस्या कायम असल्याचा आरोप त्यांनी केला.

वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच वीजबिल भरलेले असतानाही काही ग्राहकांचे वीज कनेक्शन तोडले जात असल्याचा आरोपही पेडणेकर यांनी केला आहे.

याबाबत विचारणा केली असता अधिकारी आणि कर्मचारी जबाबदारी एकमेकांकडे ढकलत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे संगम परिसरातील नागरिकांना होत असलेल्या त्रासाची तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या प्रश्नाबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा इशारा पेडणेकर यांनी दिला आहे.

> “ महेश पेडणेकर यांचे गेल्या मार्च महिन्यापासून सुमारे ३० हजार रुपयांचे वीजबिल थकीत आहे. अनेकदा सूचना करूनही त्यांनी थकीत बिलाकडे दुर्लक्ष केले आहे. थकीत वीज बिलाच्या अनुषंगाने कारवाई करण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना धमकावण्यात आले आहे. संगम परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, हा प्रश्न लवकरच मार्गी लावण्यात येईल.
>
> – श्री. दळवी, सहाय्यक अभियंता ”

# एचएसआरपी नंबर प्लेट नसणे पडले महागात!

**■ २६ दिवसांत रायगड जिल्ह्यात ३३० वाहनचालकांवर कारवाई**

**■ १ लाख ६६ हजारांचा दंड वसूल**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक (एचएसआरपी) न बसविणाऱ्या वाहनचालकांविरोधात रायगड जिल्हा वाहतूक शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. १ ते २६ जुलैदरम्यान अवघ्या २६ दिवसांत ३३० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून तब्बल १ लाख ६६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. त्यामुळे एचएसआरपी नंबर प्लेटकडे दुर्लक्ष करणाऱ्या वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरण, पर्यटन आणि नागरीकरणाचा वेगाने विस्तार होत असल्याने वाहनांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. दुचाकींसह विविध प्रकारच्या वाहनांची खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल वाढला असून, जिल्ह्यात दरवर्षी २५ हजारांहून अधिक दुचाकींची नोंदणी होत असल्याची माहिती संबंधित विभागाकडून देण्यात आली आहे.

वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता वाहन चोरी, बनावट नंबर प्लेटचा वापर तसेच चोरीच्या वाहनांचा माग काढण्याच्या दृष्टीने एचएसआरपी नंबर प्लेट महत्त्वाची ठरत आहे. वाहनाला सुरक्षित आणि कायमस्वरूपी ओळख मिळावी, बनावट नंबर प्लेटला आळा बसावा आणि चोरीच्या वाहनांचा शोध घेणे सुलभ व्हावे, यासाठी शासनाच्या निर्देशानुसार एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

परिवहन विभागाकडून वाहनमालकांना वेळोवेळी सूचना आणि मुदत देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही नियमांचे पालन न करणाऱ्यांविरोधात आता विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध मार्गांवर वाहनांची तपासणी करून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जात आहे.

१ ते २६ जुलै या कालावधीत ३३० वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून १ लाख ६६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. वाहनमालकांनी कारवाई टाळण्यासाठी आपल्या वाहनावर अधिकृत एचएसआरपी नंबर प्लेट तातडीने बसवून घ्यावी, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# युवक बेपत्ता

**नागोठणे :** नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंभारआळी येथील युवराज यशवंत मगर (३५) हे दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता कामावर जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले. मात्र, त्यानंतर ते घरी परत न आल्याने त्यांच्या पत्नी कोकीला युवराज मगर (वय ३१) यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बेपत्ता झालेल्या युवराज यशवंत मगर यांचा रंग सावळा असून अंगात खाकी रंगाची फुल पँट, निळ्या रंगाचा हाफ शर्ट, पायात चप्पल, उंची सुमारे १६४ सें.मी., केस काळे व चेहरा उभट आहे. या प्रकरणी दिनांक २१ जून २०२६ रोजी रात्री ८.३८ वाजता नागोठणे पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास महिला सहा. फौजदार डी. सी. पाटील या सपोनि रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.



# नेरळ कुंभारआळी केंद्र शाळेला गळती

## • शैक्षणिक साहित्य प्लास्टिक टाकून झाकण्याची वेळ

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ गावात रायगड जिल्हा परिषदेची केंद्र शाळा पावसाच्या पाण्यामुळे पूर्णपणे भिजून गेली आहे. या शाळेच्या स्लॅबमधून पाण्याची गळती सुरू झाल्याने शाळेच्या दोन्ही मजल्यांवरील शैक्षणिक साहित्य भिजले आहे. दरम्यान, पाण्याची गळती रोखण्यासाठी शाळेच्या छपरावर पत्र्याचा शेड बसवावा, अशी मागणी पालकवर्गातून करण्यात आली आहे. तर तालुक्यातील पाण्याच्या झालेल्या सर्व शाळांनी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती तालुका गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांनी दिली आहे.

नेरळ गावात कुंभार आळी येथे रायगड जिल्हा परिषदेची दुमजली इमारत असलेली शाळा आहे. या शाळेला कर्जत तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाचा केंद्र शाळा असा दर्जा असून दुमजली इमारतीत इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण देणारी शाळा आहे. नेरळ गावातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या शाळेत आजूबाजूच्या भागातून विद्यार्थी येत असल्याने या शाळेला महत्व आहे. या ठिकाणी पूर्वी कौलारू वर्गखोल्या होत्या आणि षटकोनी शाळा इमारतदेखील होती. त्या सर्व इमारती जमीनदोस्त करून जिल्हा परिषदेचे नेरळ विकास प्राधिकरणकडून दुमजली इमारत बांधण्यात आली आहे. त्याचवेळी तेथे यापूर्वीची जुनी आरसीसी बांधकाम केलेली इमारतदेखील आहे. याच ठिकाणावरून शिक्षण विभागाच्या केंद्र शाळेचा कारभार शिक्षण विभागाकडून चालवला जातो. नेरळ विकास प्राधिकरण कडून बांधण्यात आलेल्या शाळेमध्ये तीन वर्षांपूर्वी वर्ग भरण्यास सुरुवात झाली. त्याआधी दीड वर्षे ही इमारत बांधून तयार होती आणि तेथे वर्ग सुरू झाले नव्हते. सध्या या ठिकाणी असलेले सर्व वर्गखोल्या या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी वापरल्या जात आहेत.

या पाण्याच्या गळतीमुळे शाळेतील सर्व शैक्षणिक साहित्य खराब होऊ लागले असून, अनेक ठिकाणी प्लास्टिक आच्छादन टाकून हे साहित्य झाकून ठेवण्याची वेळ शाळेच्या शिक्षकांवर आली आहे.



### अंगणवाडी केंद्रात बसायला जागा नाही

या केंद्र शाळेच्या आवारात महिला बालकल्याण विभागाची अंगणवाडी केंद्र आहे. या अंगणवाडी केंद्रात येणारी बालके यांना खाली बसावे लागते. त्या बालकांना बसायला देखील जागा नाही.

> “ आमच्या मुलांना वर्गखोलीत बसताना पावसाचा पाण्याचा त्रास अधिक होतो. त्याचवेळी शाळेतील साहित्य भिजलेले पाहून आम्ही शिक्षकांना काहीतरी करा सांगत आहोत. पण, पावसाचा जोर कमी झाल्यावर शाळा व्यवस्थापन समितीकडून वॉटर प्रूफिंग करून घेण्याची सूचना केली आहे.
>
> – सालीक तांबोळी, पालक ”

> “ तालुक्यात पाऊस सुरू झाल्यानंतर थांबलेला नाही आणि त्यामुळे अनेक ठिकाणी वर्गखोल्या यांच्या स्लॅबमधून गळती सुरू झाली आहे.ही अडचण पालकांकडून समजल्यावर आम्ही सर्व शाळांना पत्र काढून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
>
> – अनंत खैरे, गटशिक्षणाधिकारी ”

## जाहीर सूचना

**याद्वारे जनतेस सूचना देण्यात येते की,** माझ्या अशिलांच्या सूचनेनुसार, आम्ही **अनिस ट्रस्ट,** ज्यांचे विश्वस्त **निरंजन जीवनलाल शाह** आणि **मिनल निरंजन शाह** हे आहेत (**“मालक”**) यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (**“मालमत्ता**) संबंधातील हक्कविलेखांची चौकशी आणि पडताळणी करीत आहोत.

कोणताही करारनामा, विक्री विलेख, कब्जा, वारसा, गहाण, बक्षिस, तडजोड, भाडेपट्टा, आकार, धारणाधिकार किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही अधिकार, हक्क, हितसबंध किंवा दावा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निम्नस्वाक्षरीकर्ता यांना या सूचनेच्या पासून **१४ दिवसांच्या** आत आरपीएडी/ स्पीड पोस्टद्वारे पुष्टी देणाऱ्या दस्तऐवजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. यात कसूर झाल्यास अशा प्रकारचे अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे गृहीत धरण्यात येईल आणि/किंवा त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट:**
**(मालमत्तेचे वर्णन)**

मौजे कोथिंबे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग:–

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हेक्टर–आर) | आकारणी (रुपये पैसे) |
|---|---|---|---|
| ५९ | ४/अ | १.०५ | ०.९५ |
| ५९ | ४/ब | १.०६ | ०.९५ |
| ६१ | ३ | ०.२३ | ०.८० |
| ६३ | १ | ०.५२ | ०.४५ |
| ६३ | २ | १.३६ | १.०० |
| ६३ | ३ | ४.०२ | ३.५५ |

**आज दिनांक २९ जुलै, २०२६**

**नोहिद नुरीएझदान**
**वरिष्ठ भागिदार**
**एझेडबी अँड पार्टनर्स**
वकील आणि सॉलीसीटर्स
एझेडबी हाऊस, पेनिनसुला कॉर्पोरेट पार्क,
गणपतराव कदम मार्ग,
लोअर परेल, मुंबई–४०००१३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नुमंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे शिलार, ता. कर्जत, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | सं.नं./गट नं | क्षेत्र. हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.मोतीलाल जिवराज ओसवाल | ३०/५ | ०-५३-०० | ०-२८ |
| श्री.भावेश मोतीलाल ओसवाल. | ३०/७ | ०-५४-०० | ०-२९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणतीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २९/०७/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता.सुधागड,
जि.रायगड. मो.९०२८६३५३३७/९२७०३६७२९०


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# पान १ वरून

## शेतकरी उद्ध्वस्त

संरक्षण आणि दुसऱ्या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान, हा कसला न्याय? अशी विचारणा आता नागरिकांकडून होत आहे. याशिवाय, दोन्ही अलाईनमेंटमधील बाधित शेतजमिनी, बागायती, घरे आणि इतर मालमत्तेचा अधिकृत तौलनिक अहवाल सार्वजनिक करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे. सोशल मीडियावर सुरू असलेल्या या चर्चेमुळे महामार्गाच्या अलाईनमेंट बदलाचा निर्णय पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. पोस्टमध्ये पुढे असा आरोपही करण्यात आला आहे की, नव्या प्रस्तावित मार्गावर आजही मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष शेती, आंबा–काजूच्या बागा आणि स्थानिक बागायतदार आहेत. त्यामुळे एका भागातील शेतकरी वाचले आणि दुसऱ्या भागातील शेतकरी बळी गेले का? असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

याशिवाय मांडवा–अलिबाग आणि पेझारी–अलिबाग मार्गावरील तीव्र वाहतूक कोंडी, शहर नियोजन, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही या पोस्टमध्ये करण्यात आली आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर अनेक नागरिकांनी दोन्ही अलाईनमेंटचा स्वतंत्र आणि पारदर्शक तौलनिक अभ्यास सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. मूळ मार्ग आणि नव्या मार्गात किती शेतजमीन बाधित होते, किती बागायती क्षेत्र प्रभावित होते, किती घरे आणि इतर मालमत्ता संपादित होणार आहेत, याची अधिकृत आकडेवारी जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे. या व्हायरल पोस्टमधील आरोपांबाबत संबंधित लोकप्रतिनिधी किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसून, सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चेमुळे हा विषय राजकीयदृष्ट्या अधिकच तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## अस्वस्थ चव्हाण साहेबांचा खुलासा

झालेल्या वृत्ताचे खंडन करत पुढाकाराने खुलासा प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात त्यांचे नावही नाही, त्यांच्यावर कोणताही आरोपही नाही; मग खुलासा करण्याची एवढी घाई नेमकी कशासाठी? पोलीस तपास सुरू असताना महसूल प्रशासनाकडून आरोपी अधिकाऱ्याच्या बाजूने असल्याचा आभास निर्माण होईल, अशी भूमिका घेण्याची आवश्यकता काय होती, अशी चर्चा सध्या सुरू आहे.

विशेष म्हणजे, कृषीवलने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर हा खुलासा समोर आल्याने प्रश्न आणखी गडद झाले आहेत. कृषीवलच्या वृत्तामुळे प्रशासनाला सत्य बाहेर येण्याची भीती वाटली का? असा उपरोधिक सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. खुलासा करण्यापेक्षा तपासाला सहकार्य करणे, हेच प्रशासनाचे कर्तव्य असताना, स्पष्टीकरण देण्याची घाई नेमकी कोणासाठी आणि कोणाच्या हितासाठी होती, याचे उत्तर जनतेला अपेक्षित आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना अशा प्रकारच्या अधिकृत खुलाशामुळे प्रशासनाच्या निष्पक्ष भूमिकेबाबत प्रश्न निर्माण झाल्याची भावनाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया**

शहापूरचे मंडळ अधिकारी रविदास जाधव यांना फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक झाल्यानंतर त्यांच्या समर्थनार्थ रायगड जिल्हा तलाठी संघाने २७ जुलैपासून पुकारलेल्या बेमुदत कामबंद आंदोलनाला सोशल मीडियावर तीव्र विरोध होत आहे. या आंदोलनामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि विविध दाखल्यांसाठी महसूल कार्यालयांवर अवलंबून असलेल्या लोकांची कामे ठप्प झाली असून, संतप्त नागरिकांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तीव्र प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.

**न्यायालयीन प्रक्रियेबाबत संभ्रम?**

पोयनाड पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. त्यानंतर न्यायालयानेही दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. असे असताना उपविभागीय अधिकाऱ्यांकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या खुलाशामुळे नव्या चर्चांना उधाण आले आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना अशा प्रकारचा खुलासा करण्याची आवश्यकता काय होती? प्रांतांच्या या भूमिकेमुळे न्यायालयीन प्रक्रियेबाबत संभ्रम निर्माण झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

## ज्येष्ठ विधीज्ञ पारकर यांचे निधन

फौजदारी कायद्यातील अभ्यासपूर्ण कामगिरीमुळे वकिली क्षेत्रात एक विशेष स्थान निर्माण केले होते. गुंतागुंतीच्या खटल्यांमध्ये बारकाईने अभ्यास करून आपली बाजू प्रभावीपणे मांडण्याचे एक वेगळे कौशल्य त्यांच्यामध्ये होते. त्यामुळे विधी क्षेत्रात त्यांचे नाव आदराने घेतले जात होते. अ‍ॅड. पारकर यांचे मंगळवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाबाबत राजकीय, सामाजिक क्षेत्रासह विधी क्षेत्रातून शोक व्यक्त करीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अ‍ॅड. पारकर यांचा अंत्यविधी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास अलिबागमधील वरसोली येथील स्मशानभूमीत करण्यात आला.

## भातशेती नष्ट करुन टोरंटचा रस्ता नको!

प्रकल्पासाठी धोक्याची घंटा ठरण्याची शक्यता आहे.

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत हद्दीत टोरंट पॉवर कंपनीचा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पाच्या मुख्य बांधापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यासाठी शासनाने भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली आहे. भालिवडी, आंबोट, साई डोंगर, पाली आणि पोटल या पाच गावांतील जमीन या प्रक्रियेत बाधित होणार आहे.

प्रस्तावित रस्त्याची लांबी ५.९१ किलोमीटर असून, त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याच्या हालचाली सुरू आहेत. विशेष म्हणजे, या जमिनींमध्ये सध्या भाताची लागवड सुरू आहे. या परिसरातील अनेक शेतकरी वर्षातून दोन वेळा भाताचे पीक घेत असल्याने जमीन ही केवळ मालमत्ता नसून त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. त्यामुळे तुटपुंज्या मोबदल्यासाठी जमीन देण्यापेक्षा आयुष्यभर शेती करून जमिनीचा मालक म्हणून राहण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**ग्रामसभेतच जमिनी न देण्याचा ठराव**

पाली ग्रामस्थांनी टोरंट प्रकल्पासाठी आपल्या जमिनी न देण्याची भूमिका घेतली असून, त्याबाबत ग्रामसभेत ठरावही मंजूर करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या मुख्य बांधाजवळील मोहमाळवाडी आणि आंबेवाडी येथील आदिवासी ग्रामस्थांनीही प्रकल्पाच्या हालचाली सुरू झाल्यापासून विरोध कायम ठेवला आहे. शेतकरी मंगेश म्हसे यांनी बाधित शेतकऱ्यांना एकजुटीने भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे. तर पाली येथील ग्रामस्थ शिवाजी श्रीखंडे यांनी शासनाच्या जाहिरातींना बळी न पडता जमिनीबाबत कोणताही निर्णय काळजीपूर्वक घेण्याचे आवाहन केले आहे. जमिनीचे दरच निश्चित झालेले नसताना कवडीमोल मोबदल्यात जमीन देणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

**आधीच रस्ता असताना नव्या रस्त्याचा घाट का?**

भालिवडी येथून पाली गाव आणि पुढे आंबेवाडीपर्यंत सध्या रस्ता उपलब्ध आहे. असे असताना स्वतंत्र रस्त्यासाठी नव्याने जमीन संपादित करण्याची अधिसूचना काढण्यात आल्याने शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे संबंधित अधिसूचनेविरोधात बहुसंख्य शेतकऱ्यांनी हरकती नोंदवण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांचा हा वाढता विरोध पाहता शासन आणि टोरंट कंपनीसमोर प्रकल्पाच्या मार्गातील जमीन संपादनाचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत.

**आधी दर ठरवा, मग जमीन मागा!**

जमिनीचे दर निश्चित करण्यापूर्वीच भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. दोन वेळा भाताचे पीक देणारी सुपीक जमीन कोणत्याही तुटपुंज्या मोबदल्यासाठी देणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. सध्या उपलब्ध असलेल्या रस्त्याचा पर्याय असताना नव्या रस्त्यासाठी शेतजमिनी संपादित करण्याची गरज काय, असा सवालही शेतकरी उपस्थित करत आहेत.

## अखेर काम बंद आंदोलन स्थगित

मुद्द्यावर चर्चा झाली. सकारात्मक झालेल्या चर्चेनंतर आंदोलन मागे घेण्यात आल्याची माहिती तलाठी संघाकडून देण्यात आली. अलिबाग तालुक्यातील शहापूर येथील मंडळ अधिकारी रविदास जाधव यांच्यासह पाच जणांविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जमीन भूसंपादन प्रक्रियेत आणि नुकसान भरपाई वाटपात घोटाळा केल्याचा ठपका ठेवत त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली. यामध्ये मंडळ अधिकारी रविदास जाधव आणि तलाठी सतीश ढवळे यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्यातील मंडळ अधिकारी रविदास जाधव यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली होती. रविदास जाधव यांना पोलिसांनी बेकायदेशीररित्या अटक केल्याचा आरोप करीत सोमवारपासून काम बंद आंदोलन केले. या आंदोलनामुळे सर्वसामान्य नागरिकांचे प्रचंड हाल झाले. कार्यालयांमध्ये शुकशुकाट निर्माण झाला होता. दुसऱ्या दिवशीही सर्व कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकवटले.

यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी तलाठी संघाच्या शिष्टमंडळ आणि पोलीस दलातील अधिकाऱ्यांसमवेत स्वतंत्र बैठक आयोजित केली. या बैठकीत हा तपास आता स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे वर्ग करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच ३३८ कलम काढण्याबरोबरच तलाठी यांनाही अटक न करण्याबाबत तलाठी संघाकडून सांगण्यात आले. त्यानंतर आंदोलन स्थगित केल्याचे तलाठी संघाकडून सांगण्यात आले.

## ‘त्या’ विद्यार्थ्यांना तात्काळ सोडा

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. यामध्ये दिल्लीतील जंतरमंतर आणि इतर राज्यांत कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनांमधील विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांवर कोणतीही कठोर कारवाई केली जाणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पण, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आंदोलकांना या संरक्षणातून वगळण्यात आले आहे

आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या अत्याचाराची आणि पोलिसांवर झालेल्या हल्ल्यांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्याचे संकेतही न्यायालयाने दिले आहेत. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारसह महाराष्ट्र, बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि दिल्ली सरकारांना नोटीस जारी केली आहे.

## आगीच्या भडक्यात विवाहिता भाजली

सुमारास घरातील चुलीवर स्वयंपाक करत होती. त्यावेळी अचानक आगीचा भडका उडाला आणि त्यात ती गंभीररित्या भाजली. कुटुंबियांनी तिला तातडीने अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले. महिला सुमारे ५० टक्के भाजल्याने तिची प्रकृती लक्षात घेऊन पुढील उपचारांसाठी मुंबईतील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेची नोंद मांडवा सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दरम्यान, महिलेने स्वतःला पेटवून घेतल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला आहे. त्यामुळे ही घटना नेमकी अपघाती आहे की त्यामागे अन्य काही कारण आहे, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, तपासानंतरच घटनेमागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस–१

साडेबावीस टक्के विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंडाचे हस्तांतरण करण्यास “ना हरकत प्रमाणपत्र” मागणी अर्जानुसार नोटीस श्री. मोतीराम धर्मा पालकर व इतर, राहणार जी–५१, गिरीकुन्ज सोसायटी, सरस्वती मार्ग, सेक्टर–८बी, सीबीडी बेलापूर–४०० ६१४. (अर्जदार).

ज्याअर्थी अर्जदार श्री. मोतीराम धर्मा पालकर व इतर यांना २२.५% विकसीत भूखंड वाटप योजनेअंतर्गत खालील तक्त्यात नमूद त्यांना वाटपित करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. हेजल आणि नाव्या इंफ्रा एलएलपी तर्फे भागीदार १) विजय भवानजी पटेल २) दिनानाथ एस. मिश्रा यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता “ना हरकत प्रमाणपत्रासाठी” अर्ज केला आहे. श्री. जयराम गोपाळ वनगा यांना वाटपित करण्यात आलेल्या भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्ज प्राप्त झाल्याची दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २३२४ | २१/०४/२०२६ | पुष्पक | २८ | ३७ | ३६८०.०० चौ. मी पैकी १८४०.०० चौ.मी. क्षेत्र (अविभाज्य भाग) | ०९/०१/२०२६ | २/२/२०२६<br>४/२/२०२६ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, नमूद भखंडासाठी ‘‘ना हरकत प्रमाणपत्र’’ देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/१६३/२०२६–२७

# पेझारीत शेकापकडून कँडल मार्च

## पेपरफुटीच्या धक्क्याने जीवन संपवलेल्या २१ विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पेपरफुटीच्या प्रकरणामुळे निर्माण झालेल्या नैराश्यातून जीवन संपवलेल्या २१ विद्यार्थ्यांच्या स्मृतींना पेझारी येथे शेतकरी कामगार पक्षाच्या खारेपाट विभागाच्यावतीने कँडल मार्च काढून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ''विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना जाब विचारलाच पाहिजे,'' असा सूर यावेळी उपस्थितांमध्ये उमटला.

पेझारी चेक पोस्टपासून शेकाप कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या कँडल मार्चमध्ये विद्यार्थी, पालक, तरुण, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. हातात प्रज्वलित मेणबत्त्या घेऊन विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करण्यात आल्या.

नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणानंतर देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. दिल्लीतील जंतर-मंतर येथे अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, यासाठी प्रदीर्घ काळ आंदोलन सुरू होते. या संघर्षादरम्यान जीवन




गमावलेल्या २१ विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शेकापच्यावतीने हा कँडल मार्च आयोजित करण्यात आला.

शेकाप महिला आघाडीच्या प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मार्चमध्ये शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, अलिबाग तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, अलिबाग पंचायत समितीचे माजी सदस्य विलास म्हात्रे, पेझारी-शहापूर विभाग महिला आघाडी प्रमुख ॲड. पूजा भगत, मो.रा. म्हात्रे, बाळाराम दांडेकर, प्रणित म्हात्रे, अंबरनाथ पाटील, प्रताप पाटील, भैरवी पाटील, तन्वी पाटील, श्रेया केळकर, अनिता काकडे, दिनेश पाटील, तेजस म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, प्रमोद राऊत, महेंद्र पाटील यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

शेकाप कार्यालयाजवळ कँडल मार्चची सांगता झाल्यानंतर उपस्थितांनी २१ विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी ॲड. मानसी म्हात्रे आणि अनिल पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या संघर्षाला सलाम करत त्यांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या. तसेच, अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थी आंदोलनाला शेतकरी कामगार पक्षाचा ठाम पाठिंबा असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## निवडक



### राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला निवेदन

**खांदा कॉलनी :** कळंबोली सर्कल ते पुष्पकनगर दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावरील मोठमोठे खड्डे, निकृष्ट दर्जाची दुरुस्ती आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या तीव्र वाहतूक कोंडीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेश युवकचे राज्य सचिव आदित्य जानोरकर यांनी पनवेल येथील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प संचालकांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात, या मार्गावर मोठ्या प्रमाणात धोकादायक खड्डे पडल्याने दररोज हजारो वाहनचालक, नागरिक आणि नोकरदार वर्गाला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून, अपघातांचा धोका वाढल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून काही ठिकाणी करण्यात आलेली खड्डे बुजविण्याची कामे निकृष्ट दर्जाच्या साहित्याने करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. पावसामुळे ही दुरुस्ती वाहून जाऊन पुन्हा खड्डे निर्माण झाल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याची टीका करण्यात आली. दरम्यान, या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि हक्कांसाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

### अंबा नदी पूल गेला पाण्याखाली

**पाली :** मुसळधार पावसामुळे सोमवारी (दि. २७) सायंकाळी भेरव येथील अंबा नदीचा पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला. पुलावरून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा प्रवाह सुरू असल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा मार्ग खुरावले फाट्यावरून भेरव, वाघोशी, कुंभारघर, उद्धर, महागाव आणि इतर अनेक आदिवासी वाड्या-वस्त्यांना पाली-खोपोली महामार्गाशी जोडणारा मुख्य मार्ग आहे. पूल पाण्याखाली गेल्यामुळे या परिसरातील अनेक गावांचा संपर्क तुटला. शाळा-कॉलेजचे विद्यार्थी व प्रवासी वाहतूक ठप्प झाल्याने अडकून पडले. हा पूल ६-७ दशके जुना असून, सततच्या पुरामुळे जर्जर झाला आहे. या वर्षीच्या पुराच्या प्रवाहात पुलावरील काँक्रीट आणि सुरक्षेचे कठडे पूर्णपणे वाहून गेले आहेत. पुलाच्या लोखंडी सळया बाहेर आल्या असून, मध्यभागी बाक आला आहे; तसेच, दोन्ही बाजूंचे रस्ते खचले आहेत. दररोज हजारो वाहनांची वर्दळ असणाऱ्या या धोकादायक पुलाचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून डागडुजी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



• (छायाचित्र : विनोद भोईर)

# रस्ता खचला, अर्थकारण बिघडलं

- २५ दिवस उलटले तरी ताम्हिणी मार्ग ठप्पच
- प्रवासी वर्गासह नागरिकांमधून तीव्र नाराजी

**। सलीम शेख ।**
**। माणगाव ।**

पुणे, माणगाव आणि दिघी आंतरराष्ट्रीय बंदराला जोडणारा महत्त्वाचा ताम्हिणी घाट मार्ग गेल्या २५ दिवसांपासून बंद आहे. दि.५ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुणे जिल्ह्याच्या हद्दीत रस्त्याचा काही भाग खचला, तर अनेक ठिकाणी दरडी कोसळल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे रायगड आणि पुणे जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक व पर्यटन क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील या मार्गाची दुरुस्ती अद्याप पूर्ण झालेली नसल्याने नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि पर्यटकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सन २००१ मध्ये वाहतुकीसाठी खुला झालेला ताम्हिणी घाट मार्ग हा पुणे आणि कोकणला सर्वात कमी अंतरात जोडणारा महत्त्वाचा दुवा मानला जातो. पुणे, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील हजारो पर्यटक कोकणातील समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे आणि धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी याच मार्गाचा वापर करतात. त्यामुळे हा रस्ता कोकणच्या पर्यटन उद्योगाचा कणा म्हणून ओळखला जातो. दिघी आंतरराष्ट्रीय बंदराशी हा मार्ग



जोडला गेल्यानंतर त्याचे आर्थिक महत्त्व आणखी वाढले. व्यापारी वाहतूक, औद्योगिक मालाची ने-आण, तसेच शिक्षणासाठी पुण्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा मार्ग अत्यंत उपयुक्त ठरला आहे. पुणे हे शिक्षणाचे प्रमुख केंद्र असल्याने रायगडसह कोकणातील हजारो विद्यार्थी दररोज या मार्गाचा वापर करतात. मात्र, रस्ता बंद असल्यामुळे त्यांना खोपोली-लोणावळा मार्गे मोठा वळसा घालावा लागत असून, वेळ आणि खर्च दोन्ही वाढले आहेत. त्यामुळे ताम्हिणी घाट बंद झाल्याचा सर्वाधिक फटका रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाला बसला आहे.

येथील हॉटेल, रिसॉर्ट, होमस्टे, रेस्टॉरंट, पेट्रोलपंप, लघुउद्योजक, स्थानिक दुकानदार आणि पर्यटनावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांच्या उत्पन्नात मोठी घट झाली आहे. पर्यटन हंगामात कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या व्यवसायिकांचे व्यवहार ठप्प झाल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, खासदार सुनिल तटकरे यांनी नुकतीच पुणे जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी खचलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात असून, दि.३१ जुलैपर्यंत मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे खासदारांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दोन दिवसांत हा रस्ता पुर्ववत सुरू होतो का, हे पाहणे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, ताम्हिणी घाट २५ दिवसांपासून बंद आहे आणि प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे. त्यामुळे रायगडच्या पर्यटन आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. येथील हॉटेल, होमस्टे, दुकानदार आणि विद्यार्थी सगळेच वेठीस धरले गेले आहेत. त्यामुळे रायगडच्या पर्यटन व्यवसायाचे कोट्यवधींचे नुकसान कोण भरून देणार? एमएसआरडीसीच्या निष्क्रियतेला आता जनता माफ करणार नाही. खचलेला रस्ता तात्काळ दुरुस्त न केल्यास आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे देण्यात आला आहे.

> **ताम्हिणी घाट मार्ग हा रायगडच्या पर्यटन आणि अर्थव्यवस्थेचा जीवनदायी दुवा आहे. हा मार्ग बंद असल्याने हजारो व्यावसायिक, हॉटेल चालक, विद्यार्थी आणि नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. एमएसआरडीसीने पुणे हद्दीतील खचलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून मार्ग सुरू करावा. अन्यथा जनतेच्या हितासाठी आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.**
>
> **- संताजी पवार, श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार)**

# आंदोशीत प्रशिक्षणासह सामाजिक उपक्रम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या टास्क फोर्सतर्फे सिल्वर ग्रुप सदस्यांसाठी प्रशिक्षण शिबिरासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन आंदोशी येथील जिप शाळेत करण्यात आले होते. या कार्यक्रमात ५० सिल्वर ग्रुप सदस्य आणि २४ सिनियर टास्क फोर्स सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

हा कार्यक्रम बेलोशीतील कोएसो लोकनेते ॲड. दत्ता पाटील हायस्कूलचे चेअरमन प्रकाश खडपे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी कर्करोग जनजागृती आणि महिला व मुलींसाठी



मासिक पाळी स्वच्छता व आरोग्य या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या नियोजन व समन्वयासाठी रेश्मा राऊत आणि अनुजा राऊळ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमापूर्वी टास्क फोर्स सदस्यांनी घराघरात भेटी देऊन विविध सामाजिक उपक्रमांची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचवून सहभागाचे आवाहन केले. उपक्रमांतर्गत ७२ नागरिकांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. १६ विद्यार्थ्यांसाठी चांगला वाईट स्पर्श या विषयावरील जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले. ५४ लाभार्थ्यांसाठी कर्करोग जनजागृती, ५४ महिला व मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता व आरोग्य जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी १०० वृक्षांचे वृक्षारोपणही करण्यात आले. तसेच, आदर्श पतसंस्थेने २०० फळझाडांची रोपे देणगी स्वरूपात उपलब्ध करून दिली. यावेळी डॉ. कालिका देवकाते, महेंद्र चेरकर, नेत्रतपासणी तज्ज्ञ संध्या प्रसाद, रेश्मा राऊत, अनुजा राऊळ, विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालक वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमेनिमित्त गुलाबांची मोठी आवक

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

गुरुला ज्ञानाचा दीप मानणारी परंपरा आजही कायम असून, गुरूपौर्णिमेच्या दिवशी अनेक जण आपल्या गुरुंची पूजा करून त्यांचे आशीर्वाद घेतात. गुरुपौर्णिमेनिमित्त शाळांमध्येही विशेष वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थी आपल्या वर्गशिक्षकांना गुलाबपुष्प अर्पण करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करतात. त्यामुळे फुलबाजारात गुलाब फुलांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. गुरूपौर्णिमेच्या पुर्वसंध्येला मंगळवारी (दि.२८) पनवेल येथील भाजी बाजारात गुलाब फुलांची मोठ्या प्रमाणात आवक झाली. विविध भागांतून



लाल, गुलाबी व पिवळ्या रंगांची गुलाब फुले विक्रीसाठी दाखल झाली असून, ग्राहकांचीही मोठी गर्दी दिसून आली. सध्या एक गुलाब फूल सुमारे २० रुपये दराने विकले जात असून, गुलाबाचा आकर्षक गुच्छा १५० रुपयांपासून उपलब्ध आहे. तसेच, गुरुपौर्णिमेमुळे मागणी आणखी वाढण्याची शक्यता असल्याने व्यापाऱ्यांनी पुरेसा फुलसाठा करून ठेवला आहे.

# खड्डे दुरुस्तीचा यशस्वी प्रायोगिक उपक्रम

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारे अपघात आणि त्यातून होणारी जीवितहानी ही देशासमोरील गंभीर समस्या बनली आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था अधिकच बिकट होत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येतो. या पार्श्वभूमीवर स्वदेशी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावी उपाय शोधण्याच्या उद्देशाने मिशन पॉटहोल फ्री इंडिया अंतर्गत खोपोली येथील राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे भरून त्याची प्रत्यक्ष चाचणी घेण्याचा प्रायोगिक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या उपक्रमात जीएसपीएल-मेलीकाचे संचालक अस्लम लोगडे यांनी विकसित केलेल्या विशेष दुरुस्ती साहित्याचा वापर करण्यात आला. सिमेंट काँक्रीट तसेच डांबरी रस्त्यांवरील खड्डे मुसळधार पावसातही प्रभावीपणे भरता येतात, याची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात आली. प्रतिकूल हवामानात या उत्पादनाची कार्यक्षमता तपासणे आणि नागरिकांसमोर त्याचे प्रात्यक्षिक सादर करणे हा या प्रयोगामागील मुख्य उद्देश होता. या उपक्रमासाठी हेल्प फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने पुढाकार घेतला. खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, अतिक खोत, अश्पाक लोगडे, खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेविका सानिया शेख, प्रतीक्षा रेटरेकर, अश्विनी अत्रे, मेलीका टीम तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



**वावेलवाडी शाळेचा अनोखा उपक्रम | विद्यार्थ्यांनी अनुभवला लावणीचा आनंद**

# मोबाईलच्या युगात, नांगर हातात

**। संदेश घोलप ।**
**। श्रीवर्धन ।**

आधुनिक युगात संगणक, टीव्ही आणि मोबाईलच्या आभासी विश्वात हरवत चाललेल्या आजच्या पिढीला मातीचा सुगंध आणि शेतीचे खरे महत्त्व कळावे, या उद्देशाने श्रीवर्धन तालुक्यातील वावेलवाडी येथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांसाठी एका विशेष भात लावणी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन मुख्याध्यापकांसह शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी थेट शेतात उतरून भात लावणीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

केवळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून न थांबता, शाळेच्या शिक्षकांनी स्वतः चिखलात उतरून हातात नांगर धरला आणि शेतीची कामे केली. शिक्षकांना



अशा प्रकारे शेतात काम करताना पाहून विद्यार्थ्यांचा उत्साह दुप्पट झाला. गुरुजींनी दाखवलेल्या या धड्यामुळे मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. यावेळी शाळेतील लहानग्या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच शेतातील लाल चिखलात पाय ठेवत भात लावणी केली. शिक्षकांच्या सोबतीने चिखलात काम करताना मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. निसर्गाच्या सानिध्यात राहून प्रत्यक्ष शेती कशी केली जाते, हे मुलांनी अगदी जवळून पाहिले व अनुभवले. या उपक्रमात स्थानिक शेतकरी सुरेश निवाते, राजू रामाणे, रमेश खाडे आणि स्थानिक महिला मंडळाने विशेष सहभाग घेतला. त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना भाताचे रोप कसे धरावे, त्याची जुडी कशी बनवावी आणि चिखलात ते योग्य पद्धतीने कसे रोवावे याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. त्यानुसार विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने स्वतःच्या हाताने भाताची रोपे शेतात लावली. ''आपण रोज जे अन्न खातो, त्यामागे आपल्या शेतकरी राजाचे किती अथांग कष्ट असतात,'' याची जाणीव या वेळी मुलांना व उपस्थितांना झाली. त्यामुळे घामातून मोती पिकवणाऱ्या बळिराजाबद्दल मुलांच्या मनात आदराची भावना अधिकच द्विगुणित झाली.

निसर्गाच्या कुशीत आणि कोकणी पारंपरिक लोकगीतांच्या सुरावर शिक्षक आणि मुलांनी या श्रमदानाचा मनसोक्त आनंद लुटला. हा उपक्रम केवळ एक प्रात्यक्षिक नसून विद्यार्थ्यांसाठी एक जिवंत कार्यशाळा ठरली. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन केलेला हा नावीन्यपूर्ण उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळेच येणारी नवी पिढी आपल्या मातीशी, संस्कृतीशी आणि निसर्गाशी घट्ट जोडलेली राहील, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

भारतीय शेतकरी कामगार पक्ष
रायगड
वर्धापन दिन
दिनांक २ ऑगस्ट २०२६
लाल सलाम
भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता राशी पेट्रोल पंप, खालापूर फाटा, ता. खालापूर जि. रायगड येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.
कळावे,
आपला,
सुरेश नामदेव खैरे
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# मोदी बोलत नसलेला शब्द

देशातील अब्जाधीशांची संख्या गेल्या पाच वर्षात चौपट झाली आहे. सोमवारी सरकारनेच संसदेत ही माहिती दिली. प्राप्तिकर खात्याकडे विवरणपत्र दाखल करताना ज्यांनी आपले उत्पन्न शंभर कोटी रुपये किंवा अधिक दाखवले आहे असे लोक म्हणजे अब्जाधीश. हे खासगी आणि एका माणसाचे उत्पन्न आहे. कंपन्या किंवा व्यवसायांचे नव्हे. देशात पाच वर्षांपूर्वी असे लोक सुमारे दीडशे होते. ती संख्या आता ६०० झाली आहे. नरेंद्र मोदी सरकार विकास, विकास म्हणतात तो हाच आहे. १४० कोटींच्या भारतामध्ये वरच्या शंभर कोटीवाल्या लोकांची संख्या वाढते आहे. या मूठभर लोकांच्या हातात बहुसंख्य भारताच्या नाड्या आहेत. जागतिक विषमता अहवालानुसार या देशातील वरच्या दहा टक्के लोकांकडे तब्बल ५८ टक्के राष्ट्रीय उत्पन्न आहे. तर खालच्या ५० टक्के लोकांचे उत्पन्न केवळ दहा टक्के आहे. ही भीषण विषमता आहे. आणि मोदी कधीही हा शब्द उच्चारत नाहीत. परवा जंतरमंतरवर जी गर्दी जमली होती ती फक्त नीटच्या विद्यार्थ्यांची नव्हती. या देशाच्या व्यवस्थेने ज्यांना शिक्षण नाकारले आहे किंवा शिक्षण मिळाले तरी ज्यांना नोकरीची संधी मिळत नाही अशा मुलांची होती. झोमॅटो किंवा स्विगीमध्ये इकडून तिकडे वस्तू पोचवणाऱ्या हमालांची होती. अशा हमालांना आता गिग वर्कर्स असे इंग्रजी नाव आहे. पण म्हणून त्यांच्या हमालीचे कष्ट कमी होत नाहीत. या मंडळींना नोकरीची कोणतीही शाश्वती नाही. जेवढी हमाली करू तितके पैसे. त्यातही उन्ह, वारा, पाऊस झेलावा लागतो. कामाच्या तासांचा हिशेब नाही. बारा चौदा तास काम केल्यानंतर महिन्याला जेमतेम १५ किंवा २० हजार रुपये मिळतात. आजारपण वगैरे आले की संपले. भविष्याची कसलीही हमी नाही. यांच्यासारखेच रस्त्यावर काहीबाही विकून पोट भरणारे फेरीवाले किंवा तत्सम लोक आहेत. बिगारी काम करणारे मजूर आहेत. हे सगळे शिक्षित असूनही कष्टाची कामे पत्करतात. कारण यांना कोणत्याही नोकऱ्या नाहीत. मोदी विकास म्हणून जो सांगतात तो टोल गोळा करणारे कंत्राटदार, रस्ते, पूल बांधणारे बिल्डर, अदानीसारखे मोदींच्या जवळचे उद्योगपती अशांचा आहे. त्यात या खालच्या गरीब लोकांना थारा नाही. जंतरमंतरवर जमलेल्या गर्दीला या सर्वांचा पाठिंबा होता.

## गरिबीची झाकपाक

डोनाल्ड ट्रम्प अहमदाबादेत आले होते तेव्हा गरीबांच्या वस्त्या व झोपड्या असलेल्या भागात मोठे पडदे लावण्यात आले होते. ट्रम्प यांना भारताची ही दुर्दशा दिसू नये याची ती व्यवस्था होती. मोदी राजवटीचे सगळे धोरणच मुळी अशी झाकपाक करण्याचे आहे. गरिबी लपवली, बेकारीवर पांघरूण घातले की ते प्रश्न संपले असे त्यांना वाटते. अधूनमधून बेरोजगारांना पत्रे वाटण्याचा कार्यक्रम मोदी करतात. शेकडो कोटी रुपये खर्च करून त्याची प्रसिध्दी केली जाते. अशा नोकऱ्या मिळालेल्यांची संख्या काही हजार असते. प्रत्यक्षात आज दर दिवशी २७ हजार नवीन तरुण रोजगार शोधण्यासाठी दर महिन्याला बाजारात येत असतात. भारतात आज बेरोजगारीचा दर सुमारे सहा टक्के आहे. म्हणजे जवळपास आठ कोटी लोक. हे फक्त नोंदलेले बेकार आहेत. याखेरीज शहरांमधले पडेल ती कामे करणारे, मोबाईलच्या वगैरे दुकानांमध्ये किरकोळ नोकऱ्या करणारे किंवा खेड्यांमध्ये शेतात कामे करणारे यांची गणतीच नाही. घरातल्या बायकांचीही मोजणीही नाही. या खालच्या स्तराबाबत मोदी राजवटीकडे सांगण्यासारखे खूप कमी आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांच्याकडे या लोकांबाबतची संवेदनशीलता नाही. मनरेगा या ग्रामीण रोजगार हमी योजनेची मोदींनी खिल्ली उडवली होती. पण कोरोनाच्या काळात आणि नंतर आजतागायत याच योजनेने भारतातील बहुसंख्य गरिबांना हात दिला. पण अशा योजना म्हणजे गरिबांवरचे उपकार असे मोदी मानतात. बंगालमध्ये ममता बॅनर्जींचे विरोधी सरकार आहे म्हणून त्यांनी मनरेगाचा निधी बंद करून टाकला. तिथल्या गरिबांचे काय हाल होतील याची त्यांना पर्वा त्यांनी केली नाही. गरिबांना रेशनवर फुकट धान्य देतो म्हणून हे मिरवतात. पण याची किंमत वेगवेगळ्या मार्गाने वसूल केली जाते. क्रूड तेलाचे दर जगात घसरले तरी भारतात पेट्रोलचे दर कमी केले गेले नाहीत. त्यातून सरकारला काही लाख कोटी रुपये मिळाले. याच रीतीने देशात अनेक वस्तूंची महागाई होऊ दिली गेली. कंत्राटांचे पैसे वाढवले गेले. त्यातून रस्त्यांचे टोल वाढले. आरोग्य व्यवस्था सुधारण्याऐवजी विमा काढून दिला गेला. त्यातून इस्पितळांना पैसे दिले गेले. पण साध्या वैद्यकीय सेवा महाग होऊन बसल्या.


## सर्वत्र बोजवारा

शिक्षण क्षेत्राचा काय बोजवारा उडाला आहे हे दिसते आ-हेच. आज पहिलीपासून कॉलेजपर्यंत आणि कॉमर्सपासून इंजिनिअरिंगपर्यंत कोणत्याही शाखेत खासगी कोचिंग क्लास हा अत्यंत आवश्यक बनलेला आहे. यात लाखो कोटींची उलाढाल चालू आहे. त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण नाही. उलट त्यांचे आणि सरकारातल्या काही लोकांची साटीलोटी आहेत. त्यातूनच नीट पेपरफुटीसारख्या घटना घडताहेत. आज देशात कोणत्याही सरकारी परीक्षा भरवशाच्या राहिलेल्या नाहीत. त्यांचे पेपर फुटण्याची टांगती तलवार सतत मुलांच्या डोक्यावर आहे. सरकारने संसदेत ज्या अब्जाधीशांची माहिती दिली त्यांना आणि त्यांच्या आजुबाजूच्यांना हे सगळे झेलावे लागत नाही. या सर्वांचा मिळून एक २५ कोटी लोकांचा मध्यमवर्ग तयार झाला आहे. हा वर्ग पैशाच्या जोरावर काहीही विकत घेऊ शकतो अशी स्थिती आहे. किंबहुना, त्याला पैशांच्या जोरावर भारतातले अत्यंत स्वस्त मजूर उपलब्ध होतात आणि सरकार, पोलिस, प्रशासनात असलेले कॉन्टॅक्ट्स वापरून वाटेल त्या नोकऱ्या, धंदे पदरात पाडून घेता येतात किंवा कोणतेही गुन्हे पचवता येतात. धारावीचा पुनर्विकास असो की विशाखापटणमचे बंदर, या देशातले सगळे लहानमोठे प्रकल्प अदानी नावाच्या उद्योगपतीच्या हातात जातात हे सर्व जण पाहत आहेत. त्याच वेळी खाली एखाद्या कॉलेजात प्रवेश मिळणे किंवा एखाद्या इंजिनिअरला बरीशी नोकरी मिळणेही मुश्किल झाले आहे. नवयुग नावाचा एक कंत्राटदार मोदींच्या भाजपला हजारो कोटींचा निवडणूक चंदा किंवा देणग्या देतो. त्याबद्दल त्याला उत्तराखंडमधल्या वीज प्रकल्पापासून महाराष्ट्रातल्या मिसिंग लिंकपर्यंतची कंत्राटे मिळतात. या प्रकल्पांच्या बोगद्यात माणसे मरतात. पण त्यांच्याविषयी टीकास्पद काही बोलले तर मोदी किंवा फडणवीस हे विरोधकांवर देशद्रोही वा महाराष्ट्रद्रोही असल्याचा आरोप करतात. या देशातील सहाशे अब्जाधीश आणि काही हजार कोट्यधीश हेच या देशाचे राजे आहेत. बाकीची प्रजा गुलाम असल्याप्रमाणे आहे. दुर्दैवाने इथली सरकारे या विषमतेविषयी काही बोलू इच्छित नाहीत. नरेंद्र मोदी यांच्या गेल्या बारा वर्षातल्या एकाही भाषणात विषमता हा शब्द आलेला नाही. विषमता ही कल्पनाच त्यांना मान्य नाही. पकोडे तळणे हा त्यांना मोठा रोजगार वाटतो. अशा देशांमध्ये इथून पुढे वारंवार जंतरमंतरसारखी आंदोलने होणार आहेत.

## विचार

# गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने...

***''व्यास म्हणजे विस्तार, पौर्णिमा म्हणजे पूर्णता. व्यासपौर्णिमेला स्वतःचा पूर्णत्वाने विकास करण्याची प्रतिज्ञा करणे म्हणजे खरी गुरुपौर्णिमा'' असे न्यायरत्न विनोद सांगत असत. त्यांनीच गुरुपौर्णिमेला व्यासपूजा महोत्सव असे नामाभिधान दिले. या समारंभाविषयी सांगताहेत त्यांची कन्या ॲडव्होकेट अदिती वैद्य.***



**ॲड.सौ.अदिती वैद्य**

आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा. या दिवशी गुरुपूजनाचे महत्त्व. गुरूचरणी नतमस्तक व्हायचे, स्वतःचा सुद्रपणा नाहीसा होण्यासाठी गुरूंचा आशीर्वाद घ्यायचा सदुरू स्तवनांत स्वतःला विसरायचे. सदुरूंची अमर्याद अशी माया प्राप्त करण्यासाठी सदुरू सेवेत रमण्याचा प्रयत्न करायचाः 'गुरुपरंपरा' ही भारतीय संस्कृतीचे महत्वाचे अंग आहे. सदुरू हा सहजासहजी मिळत नाही. पूर्वपुण्याईने मिळू शकतो. गुरू-शिष्य नाते हे अंतर्यामी ओळख पटल्यानेच निर्माण होते. सकृपा कशासाठी? काय जरूरी? माझं कर्तृत्व ! माझं यश मी! या अहंभावी अहंकाराला सदुरूंचं महत्त्व तरी कसं समजणार?

सद्गुरूकृपेचे सामर्थ्य इतकं प्रभावी असतं, की अडाणी, साध्या, लहान मुलालाही सद्गुरूकृपेनं ब्रह्मज्ञान, होऊ शकतं. आपल्या रोजच्या स्पर्धेच्या धकाधकीच्या मामाल्यांत सद्गुरू परंपरा व श्रद्धा दुर्मिळ होऊ लागली आहे. आज अगतिकता सर्वांना व्यापून राहिलेली दिसते. म्हणूनच सद्गुरू महिमा अधिक लक्ष लावून अभ्यासण्याची गरज आहे. कितीही बुद्धिमान माणूस असता तरी सद्गुरूच्या सामर्थ्याचे यथार्थ वर्णन करणं त्याला शक्य नाही.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली ती के वळ 'सद्गरूंच्या कृपेनं' निवृत्तिनाथांच्या आशीर्वादानं- गुरुचा एक कृपाकटाक्ष, एक आशीर्वाद अनेक अडचणींतून मार्ग काढून योग्य त्या यशोशिखरावर नेतो. ज्ञानेश्वरांनी सद्गुरू सामर्थ्याचे वर्णन करण्याचा प्रयत्न म्हणजे काय, वाचे फार अचूक वर्णन त्यांच्या उपमांमधून केले आहे. सद्गुरूसामर्थ्याचे वर्णन करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मोत्याला अभ्रकाचा मुलामा स्वच्छ करण्यासारख आहे. क्षीरसागराचा पाहुणचार दुसऱ्या कंशाने तरी करण्यासारखे आहे. कापराला दुसऱ्या कशाचा तरी सुगंध देण्यासारखं आहे. चंदनाला उटी, लावण्यासारखे आहे. अमृताला शिजवण्यासारखे आहे. आकाशापेक्षा उंच मांडव घालण्यासारखे आहे. बावनकशी सोन्याला रुप्याचा मुलामा देण्यासारखं आहे. ज्ञानेश्वरमहाराजांच्या या उत्तमोत्तम उपमांमुळे आपल्यासारख्यांना एवढं नक्की कळतं, की स्वतःच्या शरीरापुरता विचार करू शकणाऱ्या माणसांना आनंद मिळवायचा असेल तर सद्गुरूकृपा झाली पाहिजे. गुरुपौर्णिमा ही सद्गुरूंची पूजा बांधण्याची तिथी. गुरु-शिष्य परंपरेत ती एक महत्त्वाची खूणगांठ. सद्गुरूकृपा प्राप्त करण्याची संधी,

''ही गुरुपौर्णिमा आमच्या परी अनेक वर्षे साजरी होत होती. हजारों, माणस ती. अप्पांच्या (कै. न्यायरत्न विनोद) दर्शनासाठी गुरुपौर्णिमेला लांबलांबून आवर्जून येत असत. अत्यंत प्रेमाने अप्पा त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, करीत असत; परंतु अप्पांना या सर्व गुरुपौरिमेला वेगळं स्वरूप द्यावं असं नाटत होतं. गुरुपौर्णिमेच्या दिवशी सर्वांनी परात्पर गुरू व्यासमहर्षी यांच्या कार्याची आठवण केली पाहिजे, व्यासांच्या श्रेष्ठत्वाची पूजा या दिवशी कैली पाहिजे. व्यासांनी वेदांची संगती लावली वेदांचे व्यवस्थापन केले, अठरा पुराणे लिहिली व्यासांनी प्रतिपादिलेला वैदिक धर्म हा विश्वधर्म आहे. महामती व्यासांच्या प्रतिभेचा स्पर्श झाला नाही असा एकही विषय अवघ्या विश्वांत नाही.

व्यासांनी ब्रह्मसूत्रे लिहिली. भागवत पुराणांतून कृष्णभक्तीचे माहात्म्य पटविले. या सर्व व्यास कार्याचा परिचय गुरुपौर्णिमेस करून समजून घेतला पाहिजे. व्यास म्हणजे विस्तार, पौर्णिमा म्हणजे पूर्णता. व्यास पौर्णिमेला स्वतःचा विस्तार करण्याचे ठरविले पाहिजे. स्वतःचा पूर्णत्वाने विकास करण्याची प्रतिज्ञा करणे म्हणजे खरी गुरुपौर्णिमा असे अप्पा आवर्जून सांगत.

गुरुपौर्णिमेला 'व्यास पूजामहोत्सव' हे नामाभिधान अप्पांनी दिले. आज गावोगांवी व्यासपूजा महोत्सव साजरा होतो. व्यासपूजा महोत्सवाची परंपरा अप्पांनी निर्माण केली. सातत्याने जोपासली. त्यांचे पश्चात् 'शांतिमंदिरात' आजही व्यासपूजा महोत्सव साजरा होतो. ही. अप्पांच्या उपस्थितीत टिळक स्मारक मंदिरांत व्यासपूजा महोला म्हणजे पुण्यांत होणाच्या सवाई गंधर्व महोत्सवास्गरखा साजरा होत असे. या व्यासपीठावरून भाषण करणे हा एक सन्मान समजला जाई. व्यासपूजा महोत्सवाची मनापासून वाट पाहणारी किती तरी माणसे होती व आहेत. ती. अप्पांचे व्यक्तिमत्त्व हे या महोत्सवाचं खरं आकर्षण होतं. पुण्यांतील काळांतील अशयी एकही नामवंत, विचारवंत, बुद्धिवंत व्यक्ति नाही की या समारंभात जी सहभागी आली नाही. बॅरिस्टर जयकर, तुकडोजीमहाराज, कुलगुरू पाटसकर, डी. जी. कर्वे, डॉ. महाजनी, स. गो, वर्ग, जगन्नाथमहाराज पंडित, श्री. के. क्षीरसागर, वि. स. पागे, प्र. रा. दामले, मायादत्त पांडचे, सिद्धेश्वरशास्त्री, चित्राव, वि. प्र. लिमये, वाराणसीचे विश्वेश्वर शिवाचार्य, महाकवी द. रा. बेंद्रे, श्री गोयल, येदुरकरशास्त्री, शिवाजीराव भोसले, नरेंद्र शर्मा, गो. नी. दांडेकर, श्री. भारदेबुवा, प्र.न. जोशी अशा कित्येक नामवंत व्यक्तींनी व्यासपूजेत बाक्सुमनांची पूजा मांधली. कित्येक पाश्चात्य विद्वानांनी स्वतःचे अनुभव निवेदन केले. या सर्वांतून एक सांस्कृतिक संघटन निर्माण होत राहिले हे निःसंशय गुरूपौर्णिमेला अप्पांकडे येणाऱ्या भक्तांना व्यासतत्त्वाची ओळख या उत्सवामुळे झाली. एक संस्कार परंपरा निर्माण झाली. व्यासपूजा महोत्सवाचं स्वरूप फारच आगळं होतं. व्यासपूजेला प्रारंभ वेदमूर्तींच्या वेदाद्घोषाने होत असे. ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चाराने वातावरण भारले जाई व एका वेगळ्या स्तरावर या कार्यक्रमाला सुरुवात होत असे. व्यासपूजा महोत्सवाचे अध्यक्ष 'व्यासमहर्षी' असत. महर्षी व्यास वा महोत्सवास सूक्ष्म रूपाने हजर राहतात म्हणून दुसऱ्या व्यक्तीस अध्यक्ष म्हणून पाचारण केले जात नाही. प्रत्येक वक्त्याच्या आधी त्याच्या कर्तृत्वाचे व परिचयाचे अप्पांचे भाषण फारच समर्पक असे. वक्त्याच्या भाषणानंतरचे अप्पांचे त्या विषयावरील निवेदन फारच प्रभावी, व्यासपूर्जेतील अप्पांचे भाषण है लखलखित ''हिऱ्यांचा हार'' असे. अप्पांच्या शब्दसामर्थ्याने श्रोते चकित होऊन जात. अप्पांच्या वक्तृत्वाच्या ओघांत नाहून निघत. या महोत्सवांत सूत्रचालकाचे काम आप्पा करीत. त्यांचं भाषण हे पट्ट बासुंदीची मेजवानी असे. वर्षभर विचारांना चालना देणारी शिदोरी अप्पा श्रोत्यांना बांधून देत. अप्पांच्या तंत्रप्रयोगाबद्दल सर्वांनाच कुतूहल असे व्यास माऊलीजवळ एकच एक इच्छा निवेदन केली तर एका इच्छेची परिपूर्ती एकत्र वर्षाच्या काळांत निश्चित स्वरूपांत होते.

अप्पा हे हजारोंचे आध्यात्मिक आणि वैयक्तिक गुरू होते. समष्टिरूपाने, परात्पर गुरूचे, व्यास महर्षीचे पूजन केले असता वैयक्तिक व सामूहिक संकल्प सिद्धीस जाऊ शकतो अशी अप्पांची श्रद्धा होती. अप्पांनी तिबेटमध्ये वास्तव्य करून काही तंत्रविद्या आत्मसात केली होती. सामूहिक प्रार्थनेबाबत त्यांनी काही गणिते अभ्यासली होती. ज्याप्रमाणे शास्त्रीय भाषा सामान्यांना समजत नाही, त्याप्रमाणे ही परिभाषा सामान्य माणसांना समजणे कठीण असे; परंतु अप्पा सोप्या विवेचनांत सांगत-तुमच्या हजारो इच्छा आकांक्षांमधून एकाच एक निकडीच्या इच्छेची निवड करा. व्यासचरणी इच्छापूर्तीची मागणी करा. अत्यंत एकाग्रपणे ही प्रार्थना करा, दुसरा विचार मनात येऊ देऊ नका. रात्री १२ च्या सुमारास आष्णा हा तंत्रविधी करीत. मनाची एकाग्रता होण्यास प्रदत होण्याकरता वातावरण शुद्ध व पवित्र होण्याकरिता धूप जाळला जाई. कापूर जाळला जाई. सर्वांना संपूर्ण शांतता पाळण्याची विनंती केली जाई- अतिशय तरल, पवित्र, शांत व सुंदर वातावरणांत हजारों माणसे मनाची एकाग्रता साधण्याचा प्रयत्न करत. व्यक्तींच्या अस्तित्वामुळे, संपूर्ण वातावरण भारून जाऊन, एक नितांत सुंदर व शुद्ध अनुभव यावेळी येत असे. एखादा शुद्ध स्वर गवसावा व त्याच्या साक्षात्काराने सर्व अस्तित्व चैतन्यमय व्हावे याचा एक विलक्षण अनुभव या वेळी येत असे. या वेळी परमेश्वराचे अस्तिव आपल्याला स्पर्शन जाऊ शकेल. इतकी एकाग्रता अनुभवर्ग एवढ्या गर्दीतही शक्य होत असे. प्रत्येकाची इच्छापूर्ती होईलच असे नाही पण हा 'संकल्प सिद्धी' चा अनुभव, हा प्रार्थनेचा अनुभव, हा निवेदनाचा अनुभव, खूप काही देऊन जात असे इतकं की ती प्रार्थना कधी संपूच नये व वातावरणातच विरघळून जावे असे वाटे. इतका उत्कळ, इतका तरल, इतका सुंदर, अनुभव आयुष्यांत अनुभवायली मिळण्याचं सौभाग्य तेथे येणाऱ्या बऱ्याच जणांना मिळत असे. ज्यांना पूर्ण एकाग्रता साधेल त्यांनी इच्छापूर्तीचा आशीर्वाद मिळतो. अगदी नोकरी मिळावी, बढ़ती मिळावी, परीक्षेत यश यावे, लग्न व्हावे अशा वैयक्तिक संकल्पांनी सिद्धी मिळावी म्हणून तंत्रविधी केला जात असे.अर्थात्, सर्व इच्छांमधून एकाच इच्छेची निवड करणे कठीण असते, पण अशांतून एका इच्छेची निवड करता आती तर ती इच्छा पूर्ण होऊ शकते. मानर श्रद्धा असलेली हजारो माणस या संकल्प समाधीच्या कार्यक्रमास येत असत अजूनही येतात.

संकल्प समाधीच्या कार्यक्रमानंतर भजन व गायनाचा कार्यक्रम होत असे. हिराबाई बंडोदेकर सरस्वती राणे या आवर्जुन हजेरी लावत डॉ. वसंतराव देशपांडे, माणिक वर्मा, जोत्स्ना भोळे, जया कनिया असे किती गायक येऊन गात. पहाटेपर्यंत मंडली कार्यक्रमांत रंगून जात. याच पद्धतीने 'महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळातर्फे आजही गुरुपौर्णिमा-व्यासपूजा महोत्सव साजरा होतो. संकल्प प्रार्थना केली जाते.

## चर्चा आजची

# पांढऱ्या अर्थव्यवस्थेला 'काळा' डाग

**वैभव पाटील**

दूध हा भारतीय संस्कृतीत जीवनाचा आधार मानला जातो. आई आपल्या लेकराला पहिल्यांदा दूध पाजते, कारण ते संपूर्ण पोषणाचे प्रतीक आहे. तसेच, शेतकरी देखील दुभत्या जनावरांची सेवा करतो, कारण त्याला माहीत असते की, दूध म्हणजे रोजच्या उत्पन्नाचा विश्वास आहे. मंदिरातील अभिषेकापासून ते रुग्णालयातील रुग्णाच्या आहारापर्यंत दूध सर्वत्र वापरले जाते. महाराष्ट्रात लाखो शेतकरी गायी किंवा म्हशींच्या आधारावर संसाराचा गाडा ओढतात. सहकारी दूध संघ, खासगी डेऱ्या, प्रक्रिया उद्योग, वाहतूक व्यवस्था आणि किरकोळ विक्रेते अशा संपूर्ण साखळीत हजारो कोटी रुपयांची उलाढाल होते. या पांढऱ्या अर्थव्यवस्थेमुळे लाखो कुटुंबांच्या चुली पेटतात. परंतु, काही लालची लोकांनी या पांढऱ्या व्यवसायाला काळ्या पैशाचा उद्योग बनवला आहे. या काळ्या उद्योगामुळे अनेक निष्पाप लोकांच्या शरीरात दररोज विष उतरते आहे आणि त्याची किंमत त्यांना आयुष्यभराच्या आजारांनी मोजावी लागत आहे.

राज्यात इतकी वर्षे अन्न पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत आहे. रसायनांची खुलेआम विक्री, बनावट कारखाने आणि भेसळयुक्त पदार्थांची निर्धास्त वाहतूक करणारी वाहने रस्त्यावरून फिरत आहेत. तरी देखील प्रशासनाला काहीच दिसले नाही? की दिसत असूनही पाहायचे नव्हते? असे सर्वसामान्यांना प्रश्न पडत आहेत. कारण अनेक वर्षे अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाया कागदापुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत. काही नमुने, काही दंड, काही प्रसिद्धीपत्रके आणि त्यानंतर पुन्हा पूर्ववत स्थिती. त्यामुळे भेसळखोरांचे धाडस वाढत गेले. त्यांना खात्री होती की, पकडले गेलो तरी फारसे काही होणार नाही. दंड भरायचा आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा धंदा सुरू करायचा. कायद्याची भीती संपली की गुन्हेगारांचे साम्राज्य निर्माण होते. दूध भेसळीच्या बाबतीत नेमके तेच झाले. राज्यात इतकी वर्षे हजारो लिटर कृत्रिम दूध तयार होत होते. त्यामुळेच असंख्य अस्वस्थ करणारे



प्रश्न आ वासून उभे राहिले आहेत.

हे कारखाने एका रात्रीत उभे राहिलेत का? ही रसायने आकाशातून पडली होती का? हजारो लिटर बनावट दूध रस्त्यावरून फिरत असताना प्रशासनाचे डोळे मिटले होते का, की ते मुद्दाम मिटून ठेवले गेले होते? वर्षानुवर्षे तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना एकदाही संशय आला नाही का? की संशय येऊनही तो पैशाच्या गठ्ठ्याखाली गाडला गेला? लोकांच्या ताटात आणि मुलांच्या दुधाच्या पेल्यात विष पोहोचत असताना या यंत्रणेतील काही हात त्याला संरक्षण देत नव्हते का? या काळ्या धंद्यातून कोट्यवधींची उलाढाल होत असताना त्याचा गंध कोणालाच लागला नाही, यावर जनतेने विश्वास ठेवायचा तरी कसा? लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या भेसळखोर नराधमांना रात्री झोप तरी कशी लागते? आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, ज्या अधिकाऱ्यानी कर्तव्यात कसूर केली किंवा या काळ्या धंद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, त्यांच्या घरातील मुलांनीही हेच दूध प्यायले नसेल का? लोकांच्या आयुष्यात विष कालविण्याचे हे पाप ते नेमके कोणत्या न्यायालयात आणि कोणत्या जन्मात फेडणार आहेत, असे एक ना अनेक प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहेत. अलीकडे उघडकीस आलेल्या भेसळीच्या प्रकारांवरून पुढे आले आहे की, शंभर लिटर शुद्ध दुधाचे पाचशे लिटर बनावट दूध बनवले जाते. रंग, वास, चव आणि फेस इतका नैसर्गिक वाटतो की, सामान्य ग्राहक तर दूरच, अनेकदा प्राथमिक तपासणीतही फसवणूक उघड होत नाही. ही भेसळ दूध, दही, ताक, तूप, श्रीखंड, पनीर, खवा, मिठाई, आईसक्रीम, चॉकलेट, बेबी फूड या सर्व माध्यमांतून प्रत्येक घरात पोहोचते. नवजात बालकापासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येकजण या विषाच्या विळख्यात सापडतो. एकंदरीत ग्राहक पैसे देऊन दूध नव्हे, तर विष विकत घेतो.

दूध भेसळीचा सर्वात मोठा फटका ग्राहकांइतकाच प्रामाणिक शेतकऱ्यालाही बसतो. पहाटेपासून राबून जनावरांची सेवा करणारा, चारा-पाणी, औषधोपचार आणि संगोपनावर हजारो रुपये खर्च करणारा शेतकरी शुद्ध दूध तयार करतो, पण त्याच दुधात भेसळखोर काही मिनिटांत रसायने मिसळून दुधाचे अनेकपट प्रमाण वाढवतात आणि कमी किमतीत विक्री करून प्रचंड नफा कमावतात. परिणामी शुद्ध दूध आणि बनावट दूध यांच्यातील स्पर्धेत प्रामाणिक शेतकरी आर्थिकदृष्ट्या मागे पडतो. एवढेच नव्हे, तर काही भेसळखोरांच्या पापाची शिक्षा संपूर्ण दुग्धव्यवसायाला भोगावी लागते. ग्राहकांच्या मनात दुधाबद्दल संशय निर्माण होतो, दूध उत्पादकांवरील विश्वास डळमळतो आणि प्रामाणिक शेतकऱ्याची प्रतिमाही नकळत मलीन होते. आयुष्यभर कष्ट करून उभा केलेला विश्वास काही लालची लोकांच्या हव्यासामुळे एका क्षणात धुळीस मिळतो. हे बदलायचे असेल, तर व्यवस्थेत आता काही आमूलाग्र बदल करावे लागतील. त्यामुळे सरकारने आता स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.

अशा निराशादायक वातावरणात एखादा तुकाराम मुंढे पुढे येतो आणि भेसळीच्या काळ्या साम्राज्याला हादरा देतो. त्यांनी सुरू केलेल्या कारवायांनी पहिल्यांदाच भेसळखोरांच्या गोटात भीती निर्माण केली. यादरम्यान, ''आधी तुकाराम मुंढे असते, तर मला कॅन्सर झाला नसता'', असे आषाढी वारीतील कॅन्सरशी झुंज देणाऱ्या एका वारकऱ्यानी म्हटले आहे. त्याने गळ्यात तुकाराम मुंढे यांचा फोटो घालून उच्चारलेले हे शब्द एका अधिकाऱ्याचा गौरव आहे. शिवाय महाराष्ट्राच्या प्रशासनाच्या गालावर बसलेली सणसणीत चपराक लगावल्याचे देखील बोलले जात आहे.

## लोकसंसद

### गुरुंबद्दल आदर, कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दिवस!

ज्ञान, संस्कार आणि आपले सुसंस्कृत जीवन घडवणाऱ्या गुरुंबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा! आषाढ महिन्यातील पौर्णिमेचा हा दिवस भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण मानला जातो. या दिवशी महाभारतासारखे महाकाव्य रचणाऱ्या आणि आद्यगुरु मानल्या गेलेल्या महर्षी वेदव्यास यांचा जन्म झाला होता. त्यामुळे या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' असेही म्हटले जाते. खरे तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात माहितीचा महापूर आलेला असताना समाजातून सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. अशा प्रतिकूल काळात गुरुंचे स्थान अधिकच महत्त्वाचे बनले आहे. सांप्रतच्या अति संपर्क असलेल्या वेगवान जगात गुरु म्हणजे आपले शाळा, महाविद्यालयातील शिक्षक एवढीच मर्यादित परिभाषा राहिली नसून आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक (मेंटॉर्स) म्हणजे जीवन अधिक सुकर करणारे गुरु, असे गुरु या संज्ञेला व्यापक स्वरूप मिळाले आहे. बदलत्या काळात मानसिक स्वास्थ्य, आरोग्य अशा सर्वच गोष्टींसाठी अनेकांना एखाद्या निष्णात गुरुची गरज भासते. अशावेळी आपल्या जीवन संघर्षात योग्य दिशा दाखवणारी कोणतीही व्यक्तीही गुरू समानच असते. अशा आयुष्याच्या अनेक टप्प्यावर जीवनाचे तारू सुखरूपपणे पैलतीरावर नेणाऱ्या गुरुंबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या गुरुपौर्णिमेच्या या पवित्र दिवशी सर्वांना शुभेच्छा!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।

हिंदू धर्मात व आपल्या संस्कृतीत गुरूंना अत्यंत महत्व-ाचे व आदराचे स्थान दिले जाते. गुरु आपल्याला केवळ शिकवणच देत नाहीत तर ते भविष्यासाठी घडवतात. मुलांचे पहिले गुरु हे आईवडील मानले जातात. त्यानंतर शिक्षक व आपले आराध्य हे आपले गुरु असतात. गुरुपौर्णिमेचा दिवस म्हणूनच इतका खास मानला जातो कारण यादिवशी सर्वजण आपल्या गुरुजनांना मानवंदना देतात. त्यांना शुभेच्छा देऊन त्यांची पूजा करून आपली कृतज्ञता त्यांच्याप्रती व्यक्त करतात.

गुरूपौर्णिमा हा सण महर्षी वेदव्यास यांच्या जन्मदिवसानिमित्त साजरा केला जातो, जे वेदांचे विभाजन करणारे ऋषी होते.या दिवशी गुरूंचा सन्मान, त्यांचे आशीर्वाद घेणे आणि त्यांची पूजा करणे ही परंपरा आहे. वेदव्यास यांनी घोर तपश्चर्येनंतर वेद, पुराणे आणि महाभारत यांची रचना केली, म्हणून त्यांना आद्य गुरू मानले जाते. संपूर्ण भारतात गुरूपौर्णिमेला विशेष असे महत्व आहे. गुरूपौर्णिमा भारतात मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी केली जाते. गुरूपौर्णिमेला 'आषाढ पौर्णिमा' आणि 'व्यास पौर्णिमा' म्हणून ही ओळखले जाते. हिंदू धर्मामध्ये गुरूला देवासमान दर्जा देण्यात आला आहे. या शुभ दिनी गुरूंचा आशीर्वाद घेतला जातो आणि गुरूंची मनोभावे पूजा केली जाते. गुरूपौर्णिमा ही महर्षी वेदव्यास यांना समर्पित करण्यात आली आहे. कारण, याच दिवशी महर्षी वेदव्यास यांचा जन्म झाला होता. त्यामुळे, हा दिवस गुरूच्या प्रती सन्मान आणि आदर व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो.

महर्षी वेदव्यास यांना वेदांचे निर्माता म्हटले जाते. पौराणिक कथेनुसार, महर्षी वेदव्यास यांचा जन्म आषाढ महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी झाला होता. त्यामुळे, वेदव्यास यांचा जन्मदिन हा गुरूपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. हा दिवस गुरूपौर्णिमा म्हणून साजरा करण्याची परंपरा फार जुनी आहे. ही परंपरा आजतागायत पाळली जात आहे. महर्षी वेदव्यास यांनी लोकांच्या कल्याणासाठी आणि ज्ञानासाठी श्रीमद भगवद्गीतेसह एकूण १८ पुराणांची रचना केली होती.गुरूपौर्णिमेची पौराणिक कथा अशी की, आषाढी पौर्णिमेच्या दिवशी ऋषी पराशर आणि निषाद कन्या सत्यवती यांच्या पोटी महर्षी वेदव्यास यांचा जन्म झाला. असे म्हटले जाते की, वेदव्यास यांनी बालपणीच त्यांच्या पालकांना परमेश्वराचे दर्शन देण्याची इच्छा व्यक्त केली होती..परंतु, त्यांची आई सत्यवतीने ही इच्छा नाकारली. मग, वेदव्यास हट्टीपणा करू ला-गले, त्यावर त्यांच्या आईने वेदव्यास यांना जंगलात जाण्याचा आदेश दिला. तसेच, जेव्हा तुम्हाला घरची आठवण येईल, तेव्हाच परत या, असे ही सांगितले.

त्यानंतर, वेदव्यास यांनी घनदाट अरण्यात घोर तपश्चर्या केली. त्यांच्या या घोर तपश्चर्येमुळे त्यांना पुण्यप्राप्ती झाली आणि वेदव्यासांनी संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवले. यानंतरच, त्यांनी ४ वेदांचा विस्तार केला. तसेच, महाभारतासह, ब्रह्मसूत्र आणि १८ महापुराणांची रचना केली. महर्षी वेदव्यास यांना चारही वेदांचे ज्ञान होते. त्यामुळेच, या दिवशी गुरूची पूजा करण्याची परंपरा शतकानुशतके चालत आलेली आहे. अगोदर काळात शिष्य स्वतः चे घर सोडून गुरूगृही राहत असत. ज्ञानसंपादनासाठी शिष्याला सुखवस्तू जीवनाचा त्याग करावा लागत असत. ज्ञानप्राप्तीनंतर गुरूला गुरूदक्षिणा देण्यासाठी गुरूपौर्णिमा साजरी केली जात असत. आता मात्र, गुरूकुल परंपरा कमी झाली आहे. मात्र, गुरूकडून ज्ञान घेण्याची प्रथा आजही तशीच आहे. आपल्या गुरूने दिलेलं ज्ञान आत्मसात करणं, गुरूंकडून मिळवलेलं ज्ञान आचरणात आणण्याचा प्रयत्न करणे. गुरूने दिलेल्या ज्ञानामुळे आपलं जीवन यशस्वी झाले. यासाठी सतत गुरू बद्दल कृतज्ञ असणे. या कृतज्ञतेपोटी गुरूंची सेवा आणि आदर करणे म्हणजे खरं गुरूपूजन, अशा प्रकारच्या गुरूपूजनातून गुरूला खरी गुरूदक्षिणा मिळत असते.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२९ जुलै
१) श्री. प्रकाश शंकर वडे
कामतआळी, अलिबाग,
दि.२९-७-१९४९
२)श्रीम.सुशीला खंडेराव मोरे
कोळीवाडा, अलिबाग
दि.२९-७-१९४६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## राष्ट्रभाषा बोल बोधिनी परीक्षेचे खारपाडा शाळेत आयोजन

**हमरापूर :** महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणेतर्फे घेण्यात येणारी राष्ट्रभाषा बालबोधिनी (५वी), प्राथमिक (६वी), प्रवेशिका (७वी), सुबोध (८वी), प्रबोध (१०वी), प्रवीण (समकक्ष बारावी) व पंडित (समकक्ष बी.ए.) परीक्षा पेण तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर खारपाडा या परीक्षा केंद्रात दिनांक ३ व ४ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यासाठी केंद्रात सशुल्क परीक्षा फॉर्म भरण्याची शेवटची अंतिम तारीख १६ ऑगस्ट आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटी, पेण, कार्यालय,शरदपवारभवन,पहिला मजला, नगरपालिका पेण केंद्र संचालक/ मुख्याध्यापिका राजश्री टेमकर, मो. ९२७३६०९२१८, परीक्षा संचालक नरेश पाटील. मो. ९२७०९३००९० यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अजित भागवत यांचे निधन


**पोलादपूर :** तालुक्यातील प्रख्यात बालवाङ्‌मयकार साहित्यिका अरुणा अजित भागवत यांचे पती अजित राजाराम भागवत यांचे २० जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. यांच्या पश्चात त्यांची पत्नी, आई, भाऊ, बहिणी तसेच मुलगा, मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी दि. २९ जुलै रोजी पोलादपूर स्मशानभूमी येथे सकाळी १० वाजता होणार आहे. उत्तरकार्य विधी शनिवारी दि.१ ऑगस्ट २०२६ रोजी पोलादपूर एसटी स्थानकासमोरील तथास्तु अपार्टमेंटमध्ये राहत्या घरी होणार आहे, अशी माहिती त्यांचे पुत्र भूषण आणि बंधू अमोल भागवत यांनी दिली.

# निसर्ग हाच चिरंतन गुरु

**विठ्ठल पाटील**

गुरु हे साक्षात ब्रम्ह असून शिष्यांच्या ठायी नवजीवन व ज्ञान निर्मित करतात. गुरु विष्णू भगवंत आहेत शिष्यांच्या गुणाचे व ज्ञानाचे रक्षण व पोषण करतात. महेश्वर हे भगवान शंकर रुपी असून वाईट वृत्ती अज्ञान व अहंकार नष्ट करतात. अश्या ज्ञानदाता व दिव्यरुपी असलेल्या गुरूंना साष्टांग नमन हे गुरु विषयी केलेला आदर व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा होय. आज पर्यावरणाची हानी पहिली तर निसर्गाला गुरु मानून पर्यावरणाचे कार्य केले पाहिजे. मानवाला व पशू पक्ष्यांचा तारणहार हा निसर्गच आहे. तोच खऱ्या अर्थाने पोषण भरण व नवपिढी घडवत असतो. एका पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे घेऊन जात असलेला निसर्ग हा चिरंतन गुरु आहे.

निसर्गाची शिकवण शब्दात मांडणे कठीण आहे. मानवाला लाभलेला पिढ्यांपिढीचा गुरु आहे. पंचमहाभूताचा अविष्कार हा निसर्गावरच अवलंबून आहे. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश ही पंच महाभूते होत. पृथ्वी माती, स्थिरता, जडत्व यांचे प्रतिनिधीत्व करते. जल म्हणजे पाणी द्रव पदार्थ, रक्त यांचे नियंत्रण करते. अग्नी हे उष्णता, ऊर्जा, प्रकाश, चयापचय तर वायू हे श्वासोच्छास, हवा संचारण गती तर आकाश



शरीरातील व बाहेरील पोकळी यांना सामावून घेणारी विस्तीर्ण पोकळी होय. यात बिघाड झाला की मनुष्य व सजीवांना हानी पोहचते. या पंचमहाभूतांमध्ये एकाचे जरी कार्य थांबले तर विनाश हा अटळ आहे. म्हणून निसर्ग वाचला पाहिजे

निसर्ग आपल्याला नेहमी भरभरुन देत असतो. त्याच्याकडे दुजाभाव नाही. निसर्गाकडून आपणास अनेक धडे मिळतात. सूर्य हा नियमितपणे उगवतो व मावळतो त्या सुर्यप्रकाशावर वनस्पतीचे अन्न व मानवी जीवन अवलंबून आहे. चंद्र हा शांत शितल असून तो प्रेम निर्माण करतो. नदी, सागर हे जलस्रोत सजिवांचे प्रमुख आधार हे सतत प्रवाही राहण्याची प्रेरणा देतात. वृक्ष हे फुले, फळे, उपयोगी वस्तू देण्याचे काम करतात. पर्वत, दरी, डोंगर मानवाला स्थैर्य शिकतात. पशुपक्षी स्वातंत्र्य, एकोपा व आनंद शिकवतात व निसर्गाचे चक्र चालू ठेवतात. ऋतू मधील बदल मानवाला बदल स्विकारण्याचे संदेश देतो. कधी सुख कधी दुखः याची जाणीव करून देतो. हवा म्हणजे प्राणवायू हा प्राणवायू सर्व सजीवांचा प्राण आहे. अनेक वटवृक्ष निस्वार्थीपणे प्राणवायू निर्माण करून जगाचे कल्याण करतात.

निसर्गाशी सुसंवाद राखल्यास जीवन समृद्ध होते. आजची गरजवृक्षसंवर्धन,पाणी वाचवणे, प्रदूषण कमी करणे, जैवविविधतेचे संरक्षण गरजेचे आहे. असा निसर्ग हा आयुष्यभर शिकवण देणारा गुरु आहे.

निसर्गाचे रक्षण करणे म्हणजे आपल्या भविष्यासाठी ज्ञान आणि जीवन जपणे होय. निसर्ग आपल्याला भरभरून देतो तो कधीही त्याची गुरुदक्षिणा मागत नाही. परंतु त्याची जाणीव आपल्याला कधी जाणवत नाही. अशा चिरंतन गुरुची गुरुदक्षिणा म्हणजे निसर्ग आणि जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे ही गुरूंना वाहिलेली खरी गुरुदक्षिणा आहे. आज हवा, जल, मृदा यांचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात झाले आहे. वाढते औद्योगीकरण व विकास कामांमुळे अनेक जंगले नष्ट झाली, त्यामुळे हवेतील प्राणवायूचे प्रमाण घटत जाऊन मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होऊ लागले आहे. जलप्रदूषणाबाबतही तसेच आहे, औद्योगीकरण व विकास कामांमुळे आज नद्या, नाले, ओढे मूळचे नैसर्गिक स्त्रोत पूर्णतः प्रदूषित झाले आहेत. या स्त्रोतांत अनेक औद्योगीकरणाचे सांडपाणी सोडून जल व जलविविधता नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे माती अर्थात मृदा हिचे सुद्धा मोठ्या प्रमाणात रासायनिक औषधे, किटके यांचा वापर वाढल्याने मृदा नापीक होत असून रासायनिक पिकांमुळे अनेक आजार उद्भवून मनुष्यहानी व आयुर्मान घटत चालले आहे. यासाठी निसर्ग वाचला तर आपण वाचणार आहोत हे लक्षात घेतले पाहिजे.

पिढ्यांपिढ्या देत आलेला व देत राहणारा निसर्ग हा गुरु पुढच्याही पिढीला लाभावा असे वाटत असले तर मानवाला त्याची दक्षिणा दिली पाहिजे. यासाठी देशी वृक्षारोपण त्यांचे संवर्धन व संरक्षण, जलस्रोत हे प्रदूषित होऊ नये म्हणून सांडपाण्याचा निचरा करणे त्यात न सोडता त्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर केला पाहिजे. तसेच हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी धूर नियंत्रण इंधनांचा वापर तसेच धूरनिर्मित करणाऱ्या उद्योग, व्यवसायावर निर्बंध लादणे गरजेचे आहे. इतरत्र टाकणारा कचरा ही जगाची डोकेदुखी बनली आहे. त्यासाठी स्वयंशिस्तीने कचऱ्याचे विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. आपण या छोट्या छोट्या गोष्टी जरी शिस्तबद्ध पद्धतीने पाळल्या तर निसर्गाची मोठ्या प्रमाणात होणारी हानी टळली जाईल या निसर्गाने सर्व सजीवांना जगण्यासाठी पृथ्वी दिली त्या पृथ्वीला हानी पोहोचवणे म्हणजे सजीव अंत निश्चित आहे.

शेतकरी झाडाला ओढून ताणून मोठं करत नाही. झाड मोठ करण्यास पाणी घालतो, खत देतो, मशागत करतो. मग संयमाने त्याची वाढ होते. तसाच गुरु शिष्यावर संस्कार करून गुणांना वाव देत दोष दूर करण्यासाठी मार्गदर्शन करतो. तसाच हा निसर्ग चिरंतन गुरु आहे. ते कालपरत्वे वेगवेगळे रूप देत असतो.

# शाकाहाराला रानभाज्यांचा अधार

## ● महिला वर्गाला रोजगाराची संधी ● रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पावसाला सुरुवात होताच डोंगर भागात निसर्ग बहरुन येतो. यासोबतच डोंगरात रानभाज्या फुलतात. या भाज्या संपूर्णपणे खत विहरीत असल्याने त्या अधिक पौष्टिक आणि आरोग्यवर्धक असतात. त्यामुळे जाजारात रानभाज्यांना अधिक मागणी असल्याने पनवेल परिसरातील विविध बाजारात महिला वर्ग या भाज्या घेऊन दाखल होत आहेत. विशेष म्हणजे, रानभाज्या खरेदीसाठी जाजारात खवय्यांची झुंबड उडत आहे.

निसर्गात आपोआप उगवणाऱ्या या भाज्यांसाठी खत किंवा शेतीचा खर्च लागत नसला, तरी जंगलातून रानभाज्या गोळा करण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे हातावर पोट



असलेल्या अनेक कुटुंबांसाठी पावसाळ्यातील रानभाज्यांचा हंगाम रोजगाराची संधी ठरत आहे.

शेवळे, टाकळा, कोळा, भारंगा, कंटोळी, कुडी, आकूर, कुलू यांसारख्या अनेक रानभाज्या औषधी गुणधर्मानी समृध्द असल्याचे मानले जाते.

शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे, पचन सुधारण्यास मदत करणे आणि पोषक तत्त्वांचा पुरवठा करणे, अशा अनेक कारणांमुळे वयोवृध्द नागरिक रानभाज्या आहारात समाविष्ट करण्याचा आग्रह धरतात. त्यामुळे रानभाज्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे.

बाजारात रानभाज्या वाटा किंवा जुडीच्या स्वरुपात विक्रीस उपलब्ध असतात. एका वाट्याची किंमत साधारण २४ ते ४० रुपये असून, जुडीचा दर तिच्या आकारानुसार ठरतो. काही पालेभाज्या ३० रुपयांपासून उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्य ग्राहकही त्या सहज खरेदी करत आहेत.

वर्षभर मेथी, पालक, शेपू, लाल माठ, आळू यांसारख्या नियमित भाज्या खाणारे नागरिक पावसाळ्यात मात्र रानभाज्यांच्या चवीचा विशेष आनंद घेतात.

नवी मुंबईतील गावठाण परिसर आणि पारंपरिक बाजारपेठांमध्ये या भाज्यांची मोठी उलाढाल होत असून, पनवेल परिसरातील मोजक्या आदिवासी पाड्यांमधूनही रानभाज्या विक्रीसाठी आणल्या जात आहेत. अनेक ग्राहक विशिष्ट विक्रेत्यांकडे आगाऊ मागणी नोंदवून ठेवतात. इंटरनेट, सोशल मीडिया आणि विविध खाद्यपदार्थांच्या कार्यक्रमांमुळे रानभाज्यांच्या पाककृती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचत असून, नव्या पिढीतही त्याविषयी उत्सुकता वाढत आहे.

रानकेळी, चायवळ, शिडाचे नोख, ससेकान, नारेली, करटुली, कुड्याची फुले, कोरड, चिवळी, चिचुरडा, शेवाळी, मोखा, कुरडू, फोडशी, कोरलं, कवळा, आंबट वेल, दिंडा, बापेटी, टेरी, आळू, भोपरं, भुईछत्री, अळंबी, भोपळ्याची पाने, इकरा, अंजाड्याची फळे, माठाचे देठ अशा विविध प्रकारच्या रानभाज्या सध्या बाजारात उपलब्ध होत आहेत.

## शिष्यवृत्ती परीक्षेत खारपाडा शाळेचा दबदबा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

सन २०२५-२६ या वर्षात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडून घेण्यात आलेल्या इयत्ता सातवी व चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा आयएसओ मानांकन राजिप उच्च प्राथमिक सेमी इंग्लिश खारपाडा, या शाळेने शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले आहे. इयत्ता सातवी मध्ये प्रियांश चंद्रकांत घरत (१८४) आणि श्रेया भाऊसाहेब पाटील (१८२) तर इयत्ता ४ थी या वर्गातून कस्तुरी सुनील पाटील (१८२) आणि स्पर्श संतोष घरत(१५६) या विद्यार्थ्यांनी चांगले गुण संपादन करून पात्र झाले आहेत. प्रविण पाटील तसेच सुरेखा रुपनर, दिनकर पाटील, प्रगती नाईक, ज्योती पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## छत्री रंगविणे कार्यशाळेला प्रतिसाद

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चेंबूर येथीलचेंबूर कर्नाटका संघ संचालित चेंबूर कर्नाटका हायस्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्री रंगविणे कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध रंगांच्या माध्यमातून आपल्या कल्पनाशक्तीला वाव देत आकर्षक कलाकृती साकारल्या. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या डॉ. गीतांजली



सालियन यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित व्हावी आणि कलात्मक अभिव्यक्तीला चालना मिळावी, या उद्देशाने शाळेत दरवर्षी छत्री रंगविणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. कलाशिक्षक श्रीराम महाजन यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, रंगसंगतीची जाण, कलात्मक दृष्टीकोन आणि सृजनशील विचार विकसित करण्यासाठी अशा कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरतात.

## महिलांसाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी व्हावे, या उद्देशाने शिवणकला व गृहउद्योगासंबंधी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन येथील मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात करण्यात आले होते. मुरूड-जंजिरा नगरपरिषद आणि राज फाऊंडेशन जाळगांव ता. दापोली जि. रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपरिषद महिला व बालकल्याण समिती अंतर्गत महिलांसाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन, व्यसन मुक्ती कार्यक्रम, महिलांसाठी शिवणकला व गृह उद्योग संबंधी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घनाटन प्रसंगी उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी मार्गदशन केले.

यावेळी विरेंद्र भगत, नगमाना खानजादे, सुगंधा मकु, यास्मिन कादिरी, पांडुरंग आरेकर, मनिष विरुकुड, श्रीकांत खोत, प्रांजली मकु, प्रमिला माळी, देवायनी गुरव, श्रध्दा अपराध, संतोष गाठे, आयुश दाभोलकर, दिप्ती एरंडे, मंदार दांडेकर, अक्षता तुळसकर, स्वप्नजा विरकुड आदिंसह मान्यवर उपस्थित होते.



### पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा | कृषी अधिकाऱ्यांचे भात उत्पादकांना आवाहन

# शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळणार

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी पीक विम्यासाठी अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांनी केले आहे. खरीप हंगाम-२०२६ साठी राज्य शासनाने सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे.

या योजनेअंतर्गत नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर, वादळ, कीड व रोगांमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळणार आहे. कर्जदार तसेच बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक



असून किमान ०.१० हेक्टर क्षेत्रासाठी विमा काढता येणार आहे. यासाठी ॲग्रीस्टॅक शेतकरी ओळख क्रमांक असणे आवश्यक असून नुकसान भरपाईसाठी डिजिटल क्रॉप सर्व्हेमध्ये पीक नोंद करणे बंधनकारक आहे.

खरीप हंगामातील भात पिकासाठी शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या केवळ २ टक्के इतकाच विमा हप्ता भरावा लागणार असून उर्वरित प्रीमियम केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान स्वरूपात भरला जाणार आहे.

रायगड जिल्हा हा जिल्हा समूह क्रमांक ६ मध्ये समाविष्ट असून या समूहासाठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडची विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकरी आपले सरकार सेवा केंद्र, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँक, संबंधित विमा कंपनीचे प्रतिनिधी तसेच अधिकृत ऑनलाइन पीक विमा पोर्टलच्या माध्यमातून अर्ज करू शकतात.

**चुकीची माहिती दिल्यास कारवाई**

**कृषी विभागाने शेतकऱ्यांना अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हेमधील पीक नोंद आणि प्रत्यक्ष पिकामध्ये तफावत आढळल्यास विमा दावा रद्द होऊ शकतो. तसेच चुकीची किंवा बोगस माहिती देऊन विमा घेतल्यास कायदेशीर कारवाईसह पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या डीबीटी योजनांचा लाभ मिळणार नसल्याचा इशाराही देण्यात आला आहे.**

> **जिल्ह्यातील सर्व भात उत्पादक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या सेवा केंद्र, बँक किंवा अधिकृत माध्यमातून ३१ जुलैपूर्वी अर्ज करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा.**
> **- प्रमोद नरळे, कृषी अधिकारी**

# निवडक



## रायगडच्या चार उपचारकांना पुरस्कार

**कोर्लई :** रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील नांदगावचे विजय तांबडकर व वाणंदे गावचे सिद्धेश बैकर, खोपोलीत अर्चना सावंत व पनवेल येथील वंदना यशवंते यांना महा अक्युपंक्चर रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ॲक्युपंक्चरिस्ट यांच्या कार्याचा हा सन्मान आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, एजीएमएमार्फत अतिशय प्रतिष्ठेचा महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार-२०२६ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथे देण्यात आला.



## कांता पादीर यांची अध्यक्षपदी निवड

**नेरळ :** कर्जत तालुका आदिवासी संघटनेची नवीन कार्यकारिणी निवड करण्यासाठी रामाचीवाडी येथे सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते कांता पादीर यांची अध्यक्षपदावर नियुक्ती करण्यात आली असून ही निवड पुढील तीन वर्षासाठी असणार आहे. यात उपाध्यपदी अर्जुन केवारी, लक्ष्मण उघडे सचिव, नितीन निरगुडा, दिनेश पिंगळे सहसचिव, भरत पादिर खजिनदार, तुषार कवठे, माहिला अध्यक्ष माझी पंचायत समीती उप सभापती जयवंती हिंदोळे, महिला उपाध्यक्ष नीलम ढोले, प्रसिद्धी प्रमुख म्हणून नितिन पारधी, मोतीराम पादिर अशा प्रकारे कार्यकारणी तयार करण्यात आली आहे.

## वहाळ शाळेतील विद्यार्थ्यांचे यश

खरोशी : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्हा परिषद शाळा, वहाळ ता. पनवेल, जि. रायगड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या परीक्षेत रुही नरेश पाटील १७८ गुण आरोही रविशकुमार चौधरी १७४ प्रतिक्षा बेळ्ळे १७२ सोनिका माने १५८, प्रांसी म्हात्रे १४८ हिबा अहमद खान १४६, महारुद्र नानासाहेब खेडकर १४० आणि अनुष्का मनोज डांगे १२२ या सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे वर्गशिक्षिका श्रुतिका पाटील यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सर्व शिक्षकवृंदाचे सहकार्य तसेच पालकांचे प्रोत्साहन मोलाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक, केंद्रप्रमुख, शाळा व्यवस्थापन समिती तसेच ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा, वहाळच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून परिसरात विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.



## परमार स्कूल शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी

**नागोठणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल २५ जुलै २०२६ रोजी जाहीर केला आहे. यामध्ये नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासंकुलातील एस.डी.परमार इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मानव पाठक इयत्ता ४ थी, अनुप कावडे व रिझना मुल्ला इयत्ता ५ वी तसेच इयत्ता ७ वी मधील श्रेया दांडेकर, पलक दापके व पियुष यादव या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे किशोर जैन, शाळा समिती चेअरमन सुरेश जैन, मुख्याध्यापिका अमृता गायकवाड व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## खोपोली पोलीस ठाण्याला लॅपटॉपचे वितरण



**खोपोली :** खोपोली पोलीस ठाण्याच्या वाढत्या कामकाजाची गरज लक्षात घेऊन गार्गी ह्युटनेस इंडस्ट्रीज आणि लायन्स क्लब खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस ठाण्याला तीन आधुनिक लॅपटॉप भेट देण्यात आले. गार्गी ह्युटनेस इंडस्ट्रीजच्या सीएसआर निधीतून या लॅपटॉपचे वितरण करण्यात आले. खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग तसेच मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग हे दोन महत्त्वाचे मार्ग जात असल्याने या परिसरात अपघात,चोरीसह विविध गुन्हे व कायदा-सुव्यवस्थेची प्रकरणे सातत्याने घडत असतात. याशिवाय पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मोठी औद्योगिक वसाहत असून विविध कार्यक्रमही नियमितपणे आयोजित केले जातात. त्यामुळे पोलीस प्रशासनावर मोठा कामाचा ताण असतो. या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. लॅपटॉप वितरण कार्यक्रमाला खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, अतुल वदडकर, रावसाहेब सुर्वे, सुग्रीव यादव, लायन्स क्लब खोपोलीचे शैली मेहता, एकता भादोरिया यांसोबत खोपोली पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जय भवानी पतसंस्थेची वार्षिक सभा

चणेरा : जय भवानी सहकारी पतसंस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक अध्यक्ष पी. बी. सरफळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेत वार्षिक अहवाल, ताळेबंद, लेखापरीक्षण अहवाल तसेच सुधारित उपविधींना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. अहवालावरील चर्चेत सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना संस्थापक अध्यक्ष पी. बी. सरफळे यांनी सविस्तर उत्तरे दिली. यावेळी सभासदांनी मासिक ठेव, शेअर्स आणि मुदत ठेवी वाढवून संस्थेच्या आर्थिक प्रगतीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यवस्थापिका, कर्मचारी आणि पिग्मी प्रतिनिधींचा विशेष गौरव करण्यात आला. संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त झाल्याबद्दलही समाधान व्यक्त करण्यात आले.

## निवडक



### नवीन पनवेल येथे ‘आनंदगाणी’ कार्यक्रम

**पनवेल** : येत्या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने नवीन पनवेल, सेक्टर ५ येथे ‘आनंदगाणी’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संगीत शिक्षिका वंदना सहस्रबुद्धे आणि प्रतिभा कुलकर्णी यांच्या पनवेल परिसरातील शिष्यवर्गाने या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ संगीतगुरू वंदना सहस्रबुद्धे, प्रतिभा कुलकर्णी, ब्राह्मण सभा नवीन पनवेलच्या अध्यक्षा दीपाली जोशी, सदस्या मंजुषा भावे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी गुरूंचे पूजन करण्यात आले. नंतर आनंदगाणी या कार्यक्रमाचा प्रारंभ गणेशवंदना आणि गुरुभक्तिपर गीतांनी करण्यात आला. त्यानंतर विविध मराठी हिंदी भक्तिगीते, भावगीते, अभंग, भारुड आणि कराओके अशा विविध गायनप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. गंधार देशपांडे यानी सिंथेसायजर व माधव भागवत यांनी तबलासाथ केला. वरदा जोशी आणि समीर सोमण यांनी आपल्या ओघवत्या वाणीने अभ्यासपूर्ण निवेदन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. मृणाल भागवत हिने तंत्रसहाय्य केले. पद्मनाभ व मुग्धा भागवत यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

### कॅप्टन विठ्ठलराव कदम यांना पुरस्कार




**रसायनी** : कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांना देशभक्ती, देशसेवा या कार्यासाठी सैनिक फेडरेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सैनिक रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. वयाची ९० वर्षे पूर्ण झालेले कॅप्टन विठ्ठलराव नारायणराव कदम यांनी भारतीय लष्कराचे आभार व्यक्त केले.कॅप्टन विठ्ठलराव कदम यांनी देशसेवेत दाखल झाल्यावर सर्व प्रथम गोवा मुक्ती मोहिमेत भाग घेतला. सन १९६२ चीन युद्ध, १९६५ पाकिस्तान युद्ध, १९७१ बांगला देश युद्ध अशा तीन युद्धात सहभागी होऊन १९८४ साली पंजाब येथे सुवर्ण मंदिरात ब्लू स्टार ऑपरेशन मधील त्यांची कामगिरी श्रेष्ठ होती.३२ वर्षे लष्करात सेवा करून निवृत्त झाले .भारतीय सैन्यातून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी कोयना प्रकल्पग्रस्त चौक वावंढळ गावच्या पुनर्वसन कामात लक्ष घातले. गावच्या सार्वजनिक जमिनीत ते प्रतिनिधी म्हणून काम केले. महाराष्ट्र राज्य सरकारने त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी हे पद दिले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून ग्रामपंचायत वावंढळ यांनीही त्यांना गौरविले आहे.

### विद्यार्थ्यांनी घेतला लावणीचा अनुभव



**पनवेल ग्रामीण** : ग्रामीण जीवन, शेतीचे महत्त्व आणि श्रम संस्कार यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने माध्यमिक विद्यालय पाच्छापूर येथे भात लागवडीचा प्रत्यक्ष अनुभव देणारा नाविन्यपूर्ण उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात पाच्छापूर गावातील प्रगतशील शेतकरी रघुनाथ जगताप यांच्या शेतामध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भात रोपांची लागवड केली. जगताप यांनी विद्यार्थ्यांना भात लागवडीची योग्य पद्धत, रोपांची अंतररचना, लागवडीतील बारकावे यांचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतः चिखलात उतरून लागवड करण्याची संधी दिली व प्रत्येक विद्यार्थ्याला संयमाने मार्गदर्शन करत शेतीचे महत्त्व समजावून सांगितले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शेतीचे महत्त्व, कष्टाचे मूल्य, निसर्गाशी असलेले नाते तसेच अन्नधान्य निर्मितीमागील शेतकऱ्यांचे अथक परिश्रम प्रत्यक्ष अनुभवता आले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हा अनुभव आनंददायी व प्रेरणादायी असल्याचे सांगितले. मुख्याध्यापक दिपक माळी यांनी सांगितले की, पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे.

### विराज ठाकूरचे सुयश



**चिरनेर** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्हा परिषदेच्या केळवणे शाळेचा विद्यार्थी विराज शरद ठाकूर याने ३०० पैकी १६२ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्याच्या या यशात आजोबा तथा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक मधुकर ठाकूर यांच्यासह शाळेच्या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. **मोबाईल** : ७५५९१८४६१२
- **नोकरीची सुवर्णसंधी** – दिशा पॅथॉलॉजी, अलिबाग येथे महिला / ज्येष्ठ नागरिक महिला यांच्यासाठी संधी. पद: रक्त नमुना (Blood Sample) संकलन कामाची वेळ: सकाळी ७:३० ते दुपारी १:०० प्रवास: पनवेल अलिबाग अप-डाउन अधिक माहितीसाठी संपर्क करा : ८५५२८५५२८८
- **पाहिजेत** – अनुभवी पिक-अप ड्रायवर/सोलार काम करणारे इलेक्ट्रीशन अनुभवी-आणि हेल्पर शिक्षणाची अट नाही. V.R.Enterprises Alibag 8888605259 / 8208140619 ( savitri perl Building Ram Mandir) (Bramhan Ali)
- अलिबागमधील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये नर्स पाहिजे. (ANM, GNM) मो.८७८८७३१६०८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# करंजा बंदरात गाळाची समस्या

**|| १५ ऑगस्टपासून सुरू होणारी मासेमारी अडचणीत || १८३ कोटींच्या निधीची तीन वर्षे प्रतीक्षाच**

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

मासेमारी हंगामात सुमारे ५०० कोटींची मासळीची निर्यात करणारे अद्यावत करंजा मच्छिमार बंदर आता मोठ्या प्रमाणावर साचलेल्या गाळाच्या समस्येमुळे आणखीनच अडचणीत आले आहे.

१५ ऑगस्टपर्यंत गाळाची समस्या कायमची सोडविण्यात आली नाही तर सुरू होणाऱ्या मासेमारी हंगामच धोक्यात येणार आहे. यामुळे मच्छिमारांवर उपासमारीचे संकट येऊन ठेपणार असल्याची भीती मच्छिमारांकडून व्यक्त केली जात आहे.

येत्या १५ ऑगस्टपासून मासेमारीचा हंगामाला सुरुवात होणार आहे.पावसाळी मासेमारी बंदी नंतर तब्बल ७६ दिवसांनी मच्छिमार बोटी मासेमारीसाठी खोल समुद्रात रवाना होणार आहेत.यासाठी रायगड जिल्ह्यातील १००० बोटी क्षमतेचे अत्याधुनिक करंजा मच्छिमार बंदरही सज्ज होण्याच्या तयारीत आहे.मात्र



रायगड जिल्ह्यातील हजारो मच्छिमारांसाठी वरदान ठरु राहाणारे २५६ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले करंजा मच्छिमार बंदर मागील वर्षभरापासून गाळाने भरण्यास सुरुवात झाली आहे. गाळाच्या समस्येमुळे हजारो मच्छिमारांना ओहोटीच्या वेळी बंदरात मासळी उतरविण्यासाठी येणाऱ्या मच्छिमारांना आणि बंदरातुन मासळी उतरवून पुन्हा बाहेर जाण्यासाठी बंदरात बाहेरच चार-चार तास समुद्रातच वाट पाहावी लागते. यामुळे बंदरात आणि बंदराबाहेर शेकडो बोटी गाळात अडकून पडतात.

करंजा मच्छिमार बंदरातील गाळ काढणे व इतर काही पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १८३ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.मात्र तीन वर्षांत अद्यापही निधीचा ठावठिकाणा नाही. कामासाठी वेळेत निधी उपलब्ध होऊ शकलेला नाही.यामुळे बंदरातील गाळ व पायाभूत सोयीसुविधांचे काम रखडले आहे.मात्र यामुळे मात्र मच्छिमारांची गैरसोय होत आहे.

करंजा मच्छिमार बंदरातुन आता पावसाळी मासेमारी बंदीचा हंगाम वगळता सुमारे ५०० कोटींची मासळी निर्यात होऊ लागली आहे.गाळाच्या आणि पायाभूत सुविधांच्या समस्येमुळे मासळी व्यावसायिक संकटात सापडले आहेत. लोकप्रतिनिधी व शासनाकडून पोकळ आश्वासनांखेरीज काहीही हाती लागत नसल्याने मच्छिमारांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

> करंजा बंदरातील गाळाची समस्या मासेमारी हंगाम सुरू होण्यापूर्वीच सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. आवश्यक पायाभूत सुविधांच्या समस्यांही दूर करण्यासाठी पाठपुरावा केला जात असल्याचा दावा मत्स्यव्यवसाय विभागाचे उपायुक्त राजु भदूले यांनी माहिती देताना व्यक्त केला आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या हलगर्जीपणाचा फटका मच्छिमारांना बसत असल्याने मच्छिमारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनावर अवलंबून न राहता काही समस्या सोडवण्यासाठी म च्छिमार बोटींकडून प्रत्येक ट्रीपमागे एक हजार रुपये तर सप्लायर्सकडून वर्षाकाठी ३० हजार रुपये वर्गणी गोळा केली जात आहे. या वर्गणीतुनच आतापर्यंत बंदरात दोन कोटी खर्चाची आवश्यकतेनुसार कामे करण्यात आली असल्याची माहिती वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट फिशरमेन वेल्फेअर असोसिएशनचे संचालक रमेश नाखवा यांनी दिली.

आता तर गाळाची समस्या कायम असल्याने मच्छीमार बोटी बंदरात येण्याचा कालावधी ६-८ तासांपर्यंत अधिक वाढणार असल्याने मासळी व्यावसायिकांवर विपरीत परिणाम होणार आहे.त्यामुळे मच्छीमारांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे, अशी भीतीही व्यावसायिक रमेश नाखवा यांनी व्यक्त केली आहे.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास विरोध

**आरपीआय (आठवले) कडून तहसीलदारांना निवेदन**

**| पाली | वाघोशी | प्रतिनिधी |**

अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या प्रस्तावाला विरोध दर्शवत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), सुधागड तालुक्याच्या वतीने पाली येथील तहसीलदारांमार्फत महाराष्ट्र शासनाला निवेदन सादर करण्यात आले. अनुसूचित जातींचे विद्यमान आरक्षण अबाधित ठेवावे आणि उपवर्गीकरणाचा कोणताही निर्णय घेऊ नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय तसेच समानतेची हमी दिली असून अनुसूचित जातींच्या संरक्षणासाठी विविध घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. दीर्घ संघर्षानंतर अनुसूचित जाती समाजाला आरक्षणाचा घटनात्मक अधिकार मिळाला असून, उपवर्गीकरणाचा निर्णय समाजात मतभेद निर्माण करणारा, सामाजिक ऐक्यावर परिणाम करणारा व अनुसूचित जातींच्या एकात्मतेला बाधा आणणारा ठरू शकतो, अशी भूमिका पक्षाने मांडली आहे.



तसेच, महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा कोणताही निर्णय घेऊ नये, विद्यमान आरक्षण व्यवस्था कायम ठेवावी, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे व सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचे संरक्षण करावे आणि यासंदर्भातील कोणताही निर्णय घेण्यापूर्वी संबंधित समाजघटक, तज्ज्ञ व सामाजिक संस्थांशी व्यापक चर्चा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

याशिवाय, दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याचाही निषेध या निवेदनातून व्यक्त करण्यात आला. शासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती तहसीलदारांमार्फत राज्य शासनाकडे करण्यात आली.पाली

## पात्र शेतकऱ्यांसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य

**| रायगड | प्रतिनिधी |**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग यांच्या पात्र शेतकऱ्यांची यादी दि. २४ जुलै २०२६ रोजी प्राप्त झाली आहे. संबंधित विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, संस्थांचे सचिव कार्यालय तसेच बँकेच्या शाखांमध्ये ही यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांकडे अग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप अग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही, त्यांनी तात्काळ जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा सीएससी केंद्रावर जाऊन अग्रीस्टॅक नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र अथवा सीएससी केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. यासंदर्भातील संपूर्ण कार्यपद्धती जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रे, सीएससी केंद्रे तसेच बँकेच्या शाखांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## नरेंद्र घाडगे राज्य कौन्सलरपदी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष नरेंद्र घाडगे यांची महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या राज्य कौन्सलर पदी निवड करण्यात आली आहे. घाडगे यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र घाडगे यांनी रायगड जिल्ह्यातील विविध गावातील ग्रामपंचायतीमध्ये प्रभावीपणे व चांगले काम केले आहे. शासनाच्या ग्रामपंचायतमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ अनेक लाभार्थ्यांना त्यांनी मिळवून दिला आहे.

## पाण्यासाठी देवन्हावे ग्रामपंचायतीवर ग्रामस्थांचा जनआक्रोश

**| खोपोली | प्रतिनिधी |**

भर पावसाळ्यातही खालापूर तालुक्यातील देवन्हावे ग्रामपंचायत हद्दीतील देवन्हावे, दहिवली आणि मिरकूटवाडी या गावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या समस्येने संतप्त झालेल्या महिला व ग्रामस्थांनी सोमवारी (दि.२७) देवन्हावे ग्रामपंचायत कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढत प्रशासनाला धारेवर धरले. पाणी आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं अशा घोषणांनी ग्रामपंचायत परिसर दणाणून गेला.

ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयाला वेढा घालत सरपंच रत्ना वाघमारे, उपसरपंच भगवान पाटील आणि ग्रामसेवक पी. एन. काळे यांना पाणीटंचाईबाबत जाब विचारला. यावेळी माजी सरपंच अंकित साखरे, सदस्य वृषाली नलावडे, मनोज पाटील, भूषण कडव आदी उपस्थित होते.

ग्रामस्थांनी दरमहा पाणीपट्टी भरूनही नळांना पाणी येत नसल्याने विकतचे पाणी घ्यावे लागत असल्याची व्यथा मांडली. वारंवार पाठपुरावा करूनही ग्रामपंचायत प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. अखेर तीव्र संतापाच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी जनआक्रोश आंदोलन छेडत तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

## उरणमध्ये अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणास तीव्र विरोध

**तहसीलदार व वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निवेदन**

**| उरण | प्रतिनिधी |**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया उरण तालुक्याचे अध्यक्ष संजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणास तीव्र विरोध दर्शविण्यात आला. यावेळी तहसीलदार तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आली.

यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवून आणलेल्या घटनात्मक आरक्षण व्यवस्थेमध्ये कोणत्याही




प्रकारचा बदल करून अनुसूचित जाती समाजामध्ये तेढ व फूट निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ नये, अशी भूमिका मांडली. अनुसूचित जातींचे घटनात्मक हक्क अबाधित ठेवून सामाजिक न्यायाचे संरक्षण व्हावे तसेच आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित समाजघटकांशी व्यापक चर्चा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## ‘नीट’च्या यशाबद्दल रोहनचा सत्कार

**खांब** : राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा मध्ये उल्लेखनीय गुण संपादन करून उज्वल यश मिळविल्याबद्दल रोहा तालुक्यातील धानकान्हे गावचा सुपुत्र रोहन विनायक गोसावी याचा ग्रामस्थ व शिक्षकांच्या हस्ते नुकताच जाहीर सत्कार करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, तसेच ज्येष्ठ नागरिक धोंडू कचरे, पांडुरंग गोसावी,यशवंत माहित, विनायक गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी रोहनच्या कठोर परिश्रमाचे, जिद्दीचे आणि चिकाटीचे मनापासून कौतुक केले. त्याच्या या यशामुळे गावाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धा परीक्षांची प्रेरणा मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्रासह सार्वजनिक वाचनालयाची मागणी

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेच्या सोमवारी झालेल्या मासिक सर्वसाधारण सभेत प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक दशरथ बाळू म्हात्रे यांनी खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकांच्या सोयी-सुविधांचा महत्त्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला. सेक्टर-२ येथील शिवमंदिर परिसरातील सिडकोकडून पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेल्या उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी आधुनिक विरंगुळा केंद्र उभारण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला.

या विरंगुळा केंद्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ शौचालय, आरामदायी बाके, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सुरक्षित पायवाट, प्रकाश व्यवस्था तसेच इतर आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय, खांदा वसाहतीमध्ये आजपर्यंत एकही सार्वजनिक वाचनालय उपलब्ध नसल्याने या विरंगुळा केंद्रात स्वतंत्र वाचनालय सुरू करण्यात यावे, अशीही महत्त्वाची सूचना त्यांनी सभागृहात मांडली. या वाचनालयाचा लाभ ज्येष्ठ नागरिकांसह विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक-युवती आणि सर्वसामान्य वाचकवर्गाला होईल, असे त्यांनी नमूद केले.

सार्वजनिक वाचनालयाची सुविधा उपलब्ध झाल्यास खांदा वसाहतीतील तरुण पिढी पुन्हा वाचन संस्कृतीकडे वळेल, ज्ञानवृद्धीला चालना मिळेल आणि सामाजिक-सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध होईल, अशी भावना नगरसेवक दशरथ बाळू म्हात्रे यांनी व्यक्त केली.

**प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य | युद्धपातळीवर कामे पूर्ण करण्याचे आश्वासन**

# ताम्हिणी घाटरस्त्याची रोजगार हमी मंत्र्यांकडून पाहणी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा तसेच निसर्ग सौंदर्यासाठी देशभर प्रसिद्ध असलेला ताम्हिणी घाट मार्ग पावसाळ्यात दरडी कोसळणे, रस्ता खचणे आणि वाहतूक विस्कळीत होणे अशा गंभीर समस्यांना वारंवार सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी आज ताम्हिणी घाट परिसराला प्रत्यक्ष भेट देत रस्त्याच्या सद्यस्थितीची आणि सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामांची सविस्तर पाहणी केली.



पाहणी दरम्यान मंत्री गोगावले यांनी घाटातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. अतिवृष्टीमुळे खचलेले रस्ते, दरडी कोसळण्याची शक्यता असलेले भाग, वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी ठिकाणे तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची त्यांनी सखोल समीक्षा केली. यावेळी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना अपघातप्रवण ठिकाणी तातडीने संरक्षक उपाययोजना राबविण्याचे, आवश्यक यंत्रसामग्री व मनुष्यबळ सदैव सज्ज ठेवण्याचे तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले. ताम्हिणी घाट हा पुणे, रायगड आणि कोकणातील पर्यटन तसेच दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत म हत्त्वाचा मार्ग असल्याने रस्ता शक्य तितक्या लवकर वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू असल्याचे मंत्री गोगावले यांनी सांगितले.

रस्ता पूर्ववत करण्यासाठी शासन आवश्यक ते सर्व निर्णय तातडीने घेईल आणि कामात कोणताही विलंब होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. पाहणी दरम्यान संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी रस्ता दुरुस्तीची सद्यस्थिती, दरडी हटविण्याचे काम, संरक्षण भिंती उभारणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आखण्यात आलेल्या नियोजनाची माहिती मंत्र्यांना दिली. रस्ता लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने कार्यरत असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी नागरिक आणि पर्यटकांना पावसाळ्यात घाटमार्गातून प्रवास करताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले. हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच प्रवास करावा, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि धोकादायक ठिकाणी अनावश्यक गर्दी टाळावी, असेही त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे भिंताड, ता.माणगाव, जि.-रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | भू.क्र. | एकूण क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| अरुण भगवान शेट | ३५१<br>३४८ | ०-१३-७०<br>०-२७-०० | ०.५०<br>१.१२ |
| खुशाल विजय शेट, मिताली प्रतिक गुजर, स्वाती विजय शेट | ३५२ | ०-४९-९० | २.०० |
| अरुण भगवान शेट, खुशाल विजय शेट, मिताली प्रतिक गुजर, स्वाती विजय शेट, लीना राजेंद्र शेट, प्रणव राजेंद्र शेट, पूजा तुषार झवर, उर्मिला उदय गुजर | ३१८<br>३३२<br>३३५<br>३४७<br>३४९ | ०-८८-८०<br>०-२२-५०<br>०-६२-५०<br>०-४५-९०<br>०-८७-०० | ३.५०<br>०.३३<br>२.११<br>१.७५<br>३.१२ |

तरी सदर मिळकतींवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
'सीता सदन' वाकण, पो. पाटणसई,
ता.-रोहा, जि. रायगड, ४०२१०६
मो.क्र.७७७५८९०४५५

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into negotiations with Mr. Chintaman Sadashiv Mhatre ("Owner") who is the sole owner of the property more particularly described in the First Schedule hereunder written (**"Property"**) and is proposing to purchase/acquire all the rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons/entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owner in/to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlement or under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owner or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the Property)**

A. All that piece and parcel of the land bearing Bhumapan Kramank/Upavibhag 17/1 admeasuring about 0.05.90 Akak HR Sq. Mtrs., Assessing to Rs. 0.09 Ps., being, lying and situate at Village Gunjis, Taluka Alibag. District Raigad.

B. All that piece and parcel of the land bearing Bhumapan Kramank / Upavibhag 18/1/9 admeasuring about 0.10.00 Akak HR. Sq. Mtrs., (including Pot Kharab/ Fallow Land admeasuring 0.01.00 Akak H.R. Sq.Mtrs.). Assessing to Rs. 0.45 Ps., being, lying and situate at Village Gunjis, Taluka Alibag, District Raigad.

C. All that piece and parcel of the land bearing Bhumapan Kramank/Upavibhag 18/1/11 admeasuring about 0.06.00 Akak H.R. Sq. Mtrs., (including Pot Kharab/Fallow Land admeasuring 0.01.00 Akak HR. Sq. Mtrs.), Assessing to Rs. 0.25 Ps., being, lying and situate at Village Gunjis, Taluka Alibag, District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag. Tal. Alibag, Dist. Raigad, 402 201.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे लोहोप, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत व त्या मिळकतीमधील शेड मिळकत त्या मिळकतींचे मालक बाळकृष्ण रामचंद्र भगत यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौरस मीटर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५६ | ३० | १००१.०० | १००.१० |

सदर मिळकतीमध्ये असलेल्या शेड मिळकती, ज्यांचे एकुण क्षेत्र ६१९२ चौरस फुट आहे.

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०७/२०२६

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम. एल.एल.बी. दिनकर-निमकर
अपार्टमेन्ट बाजारपेठ कर्जत,ता.कर्जत,
जि. रायगड- ४१०२०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक तुषार विठोबा बडेकर व सुरज विठोबा बडेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे मिरचोली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.). | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ८/३३ | एकुण क्षेत्र १-५१-०० हे आर पॉ,<br>पोट खराब क्षेत्र ०-०२-०० हे आर पॉ<br>असे एकुण क्षेत्र १-५३-०० हे आर पॉ<br>यापैकी क्षेत्र ०-२०-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | १-५७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २९/०७/२०२६

वकील **ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०९४६८५४
पत्ता- दांडवली तर्फे नीड तालुका कर्जत
जिल्हा रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतींचे विद्यमान मालक श्रीमती स्मिता हेमंत मोडक यांच्यामध्ये मिळकतींच्या खरेदीबाबत बोलणी चालू आहेत. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| बेलकडे, ता.अलिबाग. | ३८७/१ | ०-३९-००<br>पो.ख. ०-०३-१०<br>एकूण ०-४२-१० | ४.१८ |
| बेलकडे, ता.अलिबाग. | ३८७/२ | ०-३६-२०<br>पो. ख. ०-०३-००<br>एकूण ०-३९-२० | ५.१७ |
| बेलकडे, ता.अलिबाग. | ३८७/३ | ०-४२-१०<br>पो. ख. ०-०३-००<br>एकूण ०-४५-१० | ५.२९ |
| बेलकडे, ता.अलिबाग. | ४७६/१ | ०-३७-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण ०-४०-०० | २.०० |
| बोलकडे, ता.अलिबाग. | ४७६/२ | ०-५९-००<br>पो. ख. ०-०४-००<br>एकूण ०-६३-०० | ३.१३ |

संदर्भित मिळकती पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिध्द झाल्या दिनांकापासुन १४ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २९/०७/२०२६

**ॲड. किशोर म. हजारे**
बी.कॉम.एल.एल.बी.००१, वैद्यबाग
को.ऑप हौ.सो.कामतआळी,
ता. अलिबाग,जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सावरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) पराग पारीख<br>२) सुशिल प्रभाकर बोरकर<br>३) सुमन तानाजी करताडे<br>४) नम्रता सुभाष खडे<br>५) मनोहर तुकाराम साळोखे | १३ | ० | १-५६-३०<br>पो.ख. ०-०६-६०<br>एकूण १-६२-९०<br>पैकी सुमन तानाजी करताडे यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ०-२२-२५ | ८.५५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २९/०७/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता : कोर्ट व्यु को. ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्यु को.ऑप.हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## -: जाहीर नोटीस :-

खालील नमुद सहकारी गृहनिर्माण संस्थाचा सन २०२६-२०२७ ते २०३०-३१ या कालावधीकरिता निवडणूक कार्यक्रम दि. २९/०७/२०२६ रोजी संस्थेचे नोटीस बोर्ड व मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यांत आलेला आहे. नामनिर्देश अर्ज विक्री व स्विकृती तसेच नामनिर्देशन पत्राची छाननी व नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे ठिकाण हे मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका, जि. रायगड, पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार भवन, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड, कर्जत, जि. रायगड आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती दिनांक | नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचे दिवस | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निशाणी वाटप दिनांक | मतदान दिनांक, वेळ व स्थळ | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ व निकाल जाहीर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अरिवली संकुल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. बांधिवली ता. कर्जत, जि. रायगड | दि.२९/०७/२०२६ ते ३१/०७/२०२६ व दि. ०३/०८/२०२६ ते ०४/०८/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि.०५/०८/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता | दि.०६/०८/२०२६ ते दि.२०/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०३.०० वाजेपर्यंत | दि. २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.३०/०८/२०२६ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात. | दि.३०/०८/२०२६ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यंत व निकाल जाहीर मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |
| २ | तुलसी विवान सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. व्हिलेज पाषाणे ता. कर्जत, जि. रायगड | दि.२९/०७/२०२६ ते ३१/०७/२०२६ व दि. ०३/०८/२०२६ ते ०४/०८/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत | दि.०५/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.०६/०८/२०२६ ते दि.२०/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०३.०० वाजेपर्यंत | दि. २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता | दि.३०/०८/२०२६ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात. | दि.३०/०८/२०२६ रोजी मतदान संपल्यानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी संपेपर्यंत व निकाल जाहीर मतमोजणी पूर्ण झालेनंतर लगेच |

सुचना : १) राखीव मतदार संघातील उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याकडील जातीच्या दाखल्याची छायांकित प्रत प्रमाणित करुन जोडणे बंधनकारक आहे. २) नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधुन चिन्हे निवडावयाची आहेत. ३) मतदान व मतमोजणीचे दिवस वगळुन निवडणुक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक/स्थानिक सुट्टया वगळून सुरु राहील. ४) नामनिर्देशन पत्र शुल्क रु.१००/- आणि अनामत रक्कम अनुसुचित जाती/जमाती उमेदवारांसाठी रु. ३००/- अनुसुचित जाती/जमाती यांचे व्यतिरिक्त उमेदवारांसाठी रु. १०००/- राहील ५) नामनिर्देशन पत्र हे उमेदवार स्वतः अथवा त्यांचे सुचक यांनीच जमा करणे आवश्यक आहे.

दिनांक :- २९/०७/२०२६
ठिकाण :- कर्जत

**सही/-**
**( सुनिल किसन दांगट )**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**अरिवली संकुल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,**
**ता. कर्जत, जि. रायगड**

**सही/-**
**(अंकुश शिंदे )**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**तुलसी विवान सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

**सही/-**
**(शिवाजी बा. घुले)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांच्या मालकांकडून विकसनाकरीता घेतलेल्या आहेत.

**मौजे - मूद्रे खुर्द, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मे जगानन एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार<br>१) जयेंद्र गजानन देशमूख<br>२) भालचंद्र गजानन देशमुख<br>३) नमिता सुधाकर घारे | १०/१/अ | १ | ०-२३-४० | २-९४ |
| मे जगानन एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार<br>१) जयेंद्र गजानन देशमूख<br>२) भालचंद्र गजानन देशमुख<br>३) नमिता सुधाकर घारे | १०/१/अ | २ | ०-१८-३० | २-४२ |

तरी सदरची जमीन मिळकती या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकसनाकरीता देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील जमीन मिळकती या तदृंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, भाडेपट्टा, बोजा, चार्ज लिन, कुलअखत्यारपत्र, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

दि. २९/०७/२०२६

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र
रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री. विलास मगंल रूठे रा. आरवंद, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं / हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ५४/२/ब<br>खाता क्र. १४१ | एकुण क्षेत्र<br>०-२०-२० | ३-६९ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स्, मेहेर, वारसाहक्क लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २९/०७/२०२६

सही/-
**ॲड. गीतांजली जी. फुलावरे.**
कार्यालय पत्ता:''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३
कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १५/१ | एकूण क्षेत्र ०-८२-०० हे.आर, | ४.६३ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-२९/०७/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

**अलिबाग नगरपरिषद**
**जाहीर निविदा सुचना**

अलिबाग नगरपरिषद उर्दु शाळाच्या इ. ९ वी ते १० तील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश पुरविणेकामी खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कोरी निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळणेची अंतिम तारीख व वेळ | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ.न.प. उर्दुशाळा इयत्ता ९ वी ते १० वीतील मुले व मुलींना शालेय गणेवश पुरविणे | रु.५००/- | रु.५०००/- | २९/०७/२०२६ ते ०५/०८/२०२६ (कार्यालयीन वेळेत) | ०५/०८/२०२६ रोजी सायं. ६.१५ वाजेपर्यंत. |

सुचना : १) निविदेबाबतची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) महिला व बालकल्याण विभागात मिळेल.
२) निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याचे असुन लिफाफा नं.१ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं. २ मध्ये वित्तीय बोलिचा फॉर्म सादर करण्याचा आहे. दोन्ही लिफाफ्यावर कामाचे नांव व लिफाफा नंबर नमुद करावा.
३) अलिबाग नगरपरिषद कार्यालयात इसारा रक्कम पावती करुन रोखीने भरण्यांत यावी व पावती लिफाफ्यात निविदेसोबत सादर करावा.
४) निविदेबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये देण्यांत आलेल्या आहेत.

सही /-
**(सागर साळुंखे)**
**मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद**

दिनांक २९ जुलै २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिल श्री. राहुल हिरकण बच्छाव रा. केणे कॉप्लेक्स, बिंला कॉलेज रोड, आर टी ओ ऑफीस जवळ कल्याण पश्चिम ठाणे ४२१३०१.यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - आंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) काशिबाई पांडु पोटकुळे<br>२) नयना आनंता पोटकुळे<br>३) प्रकाश आनंता पोटकुळे<br>४) रेणुका आनंता पोटकुळे<br>५) सोनु आनंता पोटकुळे | ११२ | २ | ०-३०-०० | ० | २८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२९/०७/२०२६

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. ज्योती सारंग नाईक यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मांडवणे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७८/१ एकुण ०.१७.०० जागा पैकी ०.१०.५० हेक्टर आर चौ.मी.जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २९/०७/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील ॲड.

**श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात.**

अर्ज क्रमांक- / २०२६

१) श्री. अकबर युसुफ साखरकर — अर्जदार
व्यवसाय - मोलमजुरी
रा. शराई मोहल्ला धीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि. रायगड

विरुद्ध

१) श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन — सामनेवाला
ता.श्रीवर्धन, जि.रायगड

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, यातील अर्जदार श्री. अकबर युसुफ साखरकर, रा.श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील रहिवासी आहेत. अर्जदार यांचा स्वता जन्म दाखला दि.१९/१०/१९७८ रोजी मु.श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड झाला असून तिच्या जन्माची नोंदीबाबत दाखला मिळणेकरीता व तशा प्रकारचे निर्देश यातील सामनेवाला यांस मे. कोर्टामार्फत देणेकरीता मे. कोर्टात जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करुन मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा जन्माचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामाकरीता हवा आहे.

सबब या नोटीसीने कळविण्यांत येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत वा तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व स्वता जन्म दाखला दि. दि. १९/१०/१९७८ रोजी मु. श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा. न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाची तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण:- श्रीवर्धन
दिनांक :- २८/०७/२०२६

**मा. कार्यकारी दंडाधिकारी**
**ता. श्रीवर्धन, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक भरत तुकाराम दळवी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ७९/६ | एकुण क्षेत्र ०-७४-०० पैकी विकत देणार यांचे मालकी क्षेत्र ०-४४-०० पैकी विक्री केलेले क्षेत्र ०-२६-०० | ०-४० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २९/०७/२०२६

**ॲड.समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत,ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

प्रो.फी जमा : — अर्जदाराचे वकील श्री. विकास हरिश्चंद्र पाटील

## जाहिर नोटीस

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**
**जिल्हा : रायगड.**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. :९६/२०२६
(वारस दाखला मिळणेकरीता)
निशाणी क्रं. ०८/ ड

मंगेश रमाकांत भिवंडकर,
वय ५३ वर्षे, धंदा - शेती व नोकरी,
राहणार- फ्लॅट नं. १६, नादवा भवन, ...अर्जदार.
डॉ.ॲन्नी बेसन्ट रोड, कल्पना रेस्टॉरंट,
वरळी नाका, मुंबई, मुंबई ४०००१८.

विरूद्ध

कोणीही नाही ... सामनेवाले.

या जाहिर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की,

१) अर्जदार हा कै. लतीका रमाकांत भिवंडकर उर्फ भिवणकर हिचा मुलगा आहे. कै. लतीका रमाकांत भिवंडकर उर्फ भिवणकर हिचा मृत्यू दिनांक ०२-०२-२०२१ रोजी वरळी-मुंबई येथे झालेला आहे. तसेच कै. लतीका रमाकांत भिवंडकर उर्फ भिवणकर हिचे पती व अर्जदार याचे वडील रमाकांत रामराव भिवंडकर यांचा मृत्यू दिनांक २७-११-२००४ रोजी मुंबई येथे झालेला आहे.

२) अर्जदार हा कै. लतीका रमाकांत भिवंडकर उर्फ भिवणकर हिचा हिंदू वारसा अधिनियम, १९५६ च्या तरतुदीनुसार वर्ग-१ चा कायदेशीर वारस आहे.

३) कै.लतीका रमाकांत भिवंडकर उर्फ भिवणकर हिच्या सामाईक मालकीची व ताबेकब्जाची खाली वर्णन केलेली जमीन ही स्थावर मिळकत मौजे रेवदंडा, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे आहे.

| ठिकाण | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मि. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| रेवदंडा | ४३/१० | ३-५४-०० | ३५-४० |

४) कै. लतीका रमाकांत भिवंडकर उर्फ भिवणकर यांची जमीन मिळकत नावांवर होण्याकरीता अर्जदार हा मयताचा कायदेशीर वारस आहे असा 'वारस दाखला' मिळण्याकरीता सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. मयत यांना अर्जदाराच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

५) अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणालाही व्यक्तीगत हरकत करावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मा. न्यायालयात एक महिन्याच्या आंत हजर राहून आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

६) याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा.न्यायालय वरील अर्जदार याचे हक्कांबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व मयत यांचे वारसपत्रास अर्जदार हक्कदार आहेत असे शाबीत झाल्यास त्यांना ''वारस दाखला'' मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक २८ माहे जुलै सन २०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक,**
**दिवाणी न्यायालय, क स्तर,**
**अलिबाग जि.रायगड.**

सही/-
**सहाय्यक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क स्तर,**
**अलिबाग जि.-रायगड.**

# श्रीलंकेविरुद्ध भारतीय संघाची घोषणा



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

■ शुभमन गिल करणार भारताचे नेतृत्व

■ बूमराहचे पुनरागमन

१५ ऑगस्टपासून भारत विरुद्ध श्रीलंका यांच्यात दोन कसोटी सामन्यांची सिरिज खेळवली जाणार आहे. यासाठ बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. शुभमन गिल भारताचे नेतृत्व करणार आहे. १५ खेळाडूंची घोषणा करण्यात आली आहे. शुभमन गिल कर्णधार तर केएल राहुल उपकर्णधार असणार आहे. १५ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट दरम्यान ही सिरिज होणार आहे.

श्रीलंकेविरुद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेत जसप्रीत बूमराह खेळणार की नाही अशी चर्चा सुरू होती. मात्र १५ सदस्यीय संघात बूमराहचा समावेश करण्यात आला आहे. सध्या साई सुदर्शन आणि बूमराह बंगळुरू येथे सराव करत आहेत. फिटनेस टेस्ट पास झाल्यास दोन्ही खेळाडू श्रीलंकेविरुद्ध खेळताना दिसणार आहेत.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेअंतर्गत श्रीलंका विरुद्ध भारत कसोटी सिरिज होणार आहे. त्यामुळे दोन्ही संघांसाठी ही सिरिज अत्यंत महत्वाची असणार आहे. तसेच या संघात ३३ वर्षीय सारांश जैन या खेळाडूची देखील निवड करण्यात आली आहे. सारांश जैनला प्रथमच भारतीय संघात संधी मिळाली आहे. त्याने नुकतेच श्रीलंका अ विरुद्ध चांगली कामगिरी केल्याचे पाहायला मिळाले. त्यानुसार त्याला भारतीय संघात संधी देण्यात आली आहे.

भारत श्रीलंका सिरिज वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा भाग असणार आहे. इथे जिंकणाऱ्या संघाला थेट पॉईंट्स मिळणार असून त्याच्या पीसीटीमध्ये देखल सुधारणा होणार आहे. फायनलच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी भारताला आपल्या मध्ये वाढ करणे अनिवार्य आहे. सध्या भारतीय संघ पाचव्या स्थानावर आहे. तर श्रीलंकेचा संघ सहाव्या स्थानावर आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल खेळण्यासाठी पहिल्या किंवा दुसऱ्या स्थानावर असणे आवश्यक असते. त्यामुळे दोन्ही संघ सामने जिंकण्याच्या उद्देशाने मैदानात उतरणार आहेत.

### भारतीय संघ

शुभमन गिल (कर्णधार), के. एल. राहुल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), साई सुदर्शन, ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मानव सुथार, जसप्रीत बुमराह, मोहमंद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, गुरनूर ब्रार, देवदत्त पडिक्कल, सारांश जैन

# वैभव सूर्यवंशीचा आंतरराष्ट्रीय स्तरावर जलवा



■ ७ दिवसांत सचिन तेंडुलकरांचे ७ विक्रम मोडले

■ विराट कोहलीचा आणखी एक विश्वविक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा युवा स्फोटक फलंदाज याने आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण करताच अनेक दिग्गजांचे रेकॉर्ड्स मोडले आहेत. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात, क्रिकेटचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या नावावर एकेकाळी असे विक्रम होते जे मोडणे अशक्य मानले जात होते. मात्र, गेल्या आठवड्यात तीन वेगवेगळ्या भारतीय फलंदाजांनी मिळून तेंडुलकरचे सात सर्वात महत्त्वाचे विक्रम मोडले आहेत. हे तीन खेळाडू म्हणजे वैभव सूर्यवंशी, रोहित शर्मा आणि विराट कोहली.

झिम्बाब्वे आणि इंग्लंडच्या दौऱ्यांदरम्यान, अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने आपल्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाने इतिहास पुन्हा लिहिण्यास भाग पाडले. सचिन तेंडुलकरने वयाच्या १६ व्या वर्षी पाकिस्तानविरुद्ध पदार्पण केले होते, जे वय अनेक वर्षे सर्वात कमी मानले जात होते.

वैभव सूर्यवंशीने इंग्लंड दौऱ्यादरम्यान भारतासाठी सर्वात कमी वयात आंतरराष्ट्रीय पदार्पण करण्याचा सचिन तेंडुलकरचा जुना विक्रम मोडला. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेदरम्यान, वैभव आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतासाठी अर्धशतक झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला.

त्याच मालिकेतील शेवटच्या सामन्यातील आपल्या शानदार कामगिरीच्या जोरावर, वैभव साम नावीर पुरस्कार जिंकणारा सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरला. या तरुण खेळाडूने लिटल मास्टरच्या सुरुवातीच्या कारकिर्दीतील तीन सर्वात खास विक्रम आपल्या नावावर केले.

भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने इंग्लंड दौऱ्यावरील आपल्या अखेरच्या एकदिवसीय सामन्यादरम्यान सचिन तेंडुलकरचे तीन मोठे विक्रम मोडले. भारतीय सलामीवीर म्हणून सर्वाधिक शतके, एकदिवसीय शतक झळकावणारा सर्वात वयस्कर भारतीय आणि परदेशात सर्वाधिक एकदिवसीय शतके करण्याचा विक्रम त्याच्या नावावर आहे. यापूर्वी हे तीनही विक्रम सचिनच्या नावावर होते.

विराट कोहलीने आपला ३०० वा एकदिवसीय डाव पूर्ण करून, विराट कोहलीने क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. तसेच, त्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक ५०+ धावा करण्याचा सचिन तेंडुलकरचा विक्रमही मोडला.

## निवडक

### श्रीशंकर, लोकेशची अंतिम फेरीत झेप

**ग्लासगो :** ॲथलेटिक्समधील लांब उडी प्रकारात भारताच्या



दोन्ही क्रीडापटूंनी शानदार कामगिरी नोंदवली. मुरली श्रीशंकर व लोकेश सत्यनाथन यांनी पात्रता फेरीतील यशाद्वारे अंतिम फेरीतील स्थान पक्के केले. आता २९ जुलै रोजी दोघेही अंतिम फेरीत पदकासाठी दावेदारी पेश करतील. २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक जिंकणाऱ्या २७ वर्षीय मुरलीने एकाच उडीत थेट पात्रतेचा निकष पार केला. अ-गट पात्रता फेरीत श्रीशंकरने ८.०१ मीटरची उडी मारून थेट अंतिम फेरी गाठली. या स्पर्धेत थेट पात्रतेसाठी ८ मीटरची उडी किंवा किमान अव्वल १२ कामगिरीचा निकष ठरवण्यात आला होता. या गटातून थेट पात्रता मिळवणारा तो एकमेव खेळाडू ठरला, तर इतर पाच खेळाडूंनी अव्वल १२ मधील कामगिरीच्या आधारे अंतिम फेरीत प्रवेश केला. या मोसमात ८.३८ मीटरची सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या श्रीशंकरने २०२२ मधील राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. स्पर्धेतील हवामानाबद्दल श्रीशंकर म्हणाला, पात्रता फेरी अत्यंत आव्हानात्मक होती. सर्वांसाठीच हवामान कठीण होते. थंडी, सोसाट्याचा वारा आणि मधोमध येणारा पाऊस अशा स्थितीतही पहिल्याच प्रयत्नात थेट पात्रता मिळवता आल्याने अंतिम फेरीबद्दल कमालीची उत्सुकता आहे.

### शर्मिला धनखरने घडवला इतिहास

**नवी दिल्ली :** ग्लासगोमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारतासाठी सोमवार (२७ जुलै) खास ठरला. या स्पर्धेत शर्मिला



धनखरने सुवर्णपदकाला गवसणी घालत इतिहास घडवला आहे. या स्पर्धेतील पाचव्या दिवशी तिने गोळा फेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले, त्यामुळे ती सुवर्णपदक जिंकणारी भारताची पहिली पॅरा-ॲथलिट ठरली आहे. तिने सोमवारी महिलांच्या ५७ गोळा फेक प्रकारात सुवर्णपदक जिंकले. तिने ९.८१ मीटर लांब गोळा फेकत हे पदक जिंकले. त्यामुळे तिने पॅरा ॲथलेटिक्समध्ये भारतासाठी २० वर्षांची प्रतिक्षा संपवली आहे. दरम्यान याच प्रकारात भारताच्या शिल्पा के.शायलाने कांस्यपदक जिंकले. १५ ऑगस्ट १९८६ रोजी शर्मिला धनखरचा जन्म झाला असून ती हरियाणातील रेवाडीची रहिवासी आहे. तिला वयाच्या दुसऱ्याच वर्षी खूप ताप आल्यानंतर पोलिओची लागण झाली. त्यामुळे तिचा डावा पाय निकामी झाला होता. त्यामुळे सुरुवातीच्या काळात अत्यंत कठीण परिस्थितीला तिला सामोरे जावे लागले. लग्न झाल्यानंतर हिंसाचाराचाही तिला सामना करावा लागला, पण नंतर तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्याने ती पुन्हा उभी राहिली. गरीब घरातून आलेल्या शर्मिलाचे जेव्हा वयाच्या १८ व्या वर्षी पहिले लग्न झाले होते, तेव्हा तिला हुंड्यासाठी त्रास देण्यात आला होता. त्यामुळे तिला घरगुती हिंसाचाराचाही सामना करावा लागला.

# सखा पांडुरंग ऑनलाईन अभंग गायन स्पर्धेला प्रतिसाद

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून मानसी सामाजिक संस्था व एस नॅपकिन बुकेफ्ज सत्कार हाऊस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सखा पांडुरंग ऑनलाईन अभंग गायन स्पर्धेला विद्यार्थी, पालक आणि शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या अभिनव उपक्रमात विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी पांडुरंगावरील अभंग सादर करून भक्ती, संस्कार आणि मराठी सांस्कृतिक परंपरेचे सुंदर दर्शन घडविले.



या स्पर्धेत मोरू नारायण म्हात्रे विद्यालय, उलवे, महात्मा स्कूल, खांदा कॉलनी, श्री सुविद्या विद्यालय, कामोठे, महात्मा स्कूल ऑफ अकॅडमी, पनवेल, भागुबाई ठाकूर स्कूल, उरण, वेस्टर्न हिल्स हायस्कूल, कामोठे, ज्ञानवर्धिनी स्कुल शिरवळ, तसेच इतर अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेत सहभागी झालेल्या अथर्व जीवबा पोवार, याद्री अनिल महाडिक, वैष्णवी नानासाहेब दुधाळ, उत्कर्षा तळेकर, चंदन भगत, ओंकार मंगेश महाडिक यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल अभंग गायनातून भक्तिभाव व्यक्त करत उपस्थितांची मने जिंकली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ऑनलाईन ई-प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून, लकी ड्रॉ पद्धतीने निवड झालेल्या पाच विद्यार्थ्यांना भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांची आकर्षक मूर्ती भेटस्वरूप देण्यात येणार आहे.

या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, संस्कार, मराठी अभंग परंपरेची आवड आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची भावना विकसित करणे हा असल्याचे मानसी सामाजिक संस्थेचे संस्थापक डॉ. गोरखनाथ पोळ यांनी सांगितले. एस नॅपकिन बुकेज सत्कार हाऊसच्या प्रोप्रायटर सविता गोरखनाथ पोळ यांनी सर्व सहभागी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळांचे आभार मानत भविष्यातही अशाच नाविन्यपूर्ण सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. सखा पांडुरंग हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा ठरला असून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# अनाहतने रचला इतिहास!



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या अनाहत सिंगनं ज्युनियर स्क्वॅश विश्वचॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावलं आहे. विशेष म्हणजे हे विजेतेपद जिंकणारी अनाहत ही पहिली भारतीय ठरली आहे. अंतिम सामन्यात अनाहतचा सामना इजिप्तच्या रुकाया सालेम हिच्याशी झाला. कॅनडामध्ये झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अनाहतनं रुकायाचा पराभव केला.

तिन्ही सेटमध्ये अनाहतचं वर्चस्व : अनाहत सिंगनं इजिप्तच्या रुकाया सालेमला पहिल्या सेटमध्ये हरवलं आणि त्यानंतर दुसरा सेट जिंकण्यात यश मिळवलं. आता सर्वांचं लक्ष सामन्याच्या तिसऱ्या सेटवर होतं, जो अनाहत सिंगनं ११-९ नं जिंकून विजेतेपद पटकावलं. २००५ मध्ये जोशना चिनप्पानंतर अंतिम फेरीत पोहोचणारी अनाहत सिंग ही पहिली भारतीय ठरली आहे.

# पाच जणांच्या हॉकी खेळात पाकचा सहावा खेळाडू

**। ओमान । वृत्तसंस्था ।**

■ भारताने ७-३ असा मिळवला मोठा विजय

■ चुकीमुळे पराभवाची नामुष्की

पाकिस्तानचा कोणताही संघ असला तर वादविवाद नवीन नाहीत. मस्कत, ओमान इथे पारंपरिक प्रतिस्पर्धी भारताविरुद्ध झालेल्या फाईव्ह अ साईड हॉकी स्पर्धेत पाकिस्तानने चक्क सहावा खेळाडू खेळवला. खेळाच्या नावातच ५ खेळाडूंची मुभा आहे. मात्र पाकिस्तानने नियम वाकवून सहावा खेळाडू मैदानात उतरवला आणि नामुष्की ओढवून घेतली.

शुक्रवारी झालेल्या या लढतीत पाकिस्तानने सहा खेळाडू खेळवल्याचं पंचांच्या लक्षात आलं. त्यांनी तातडीने कारवाई करत पाकिस्तानच्या दोन खेळाडूंना मैदानाबाहेर पिटाळलं. त्यामुळे पाकिस्तानला चार खेळाडूंनिशी खेळावं लागलं. भारतीय संघाने याचा फायदा उठवत ७-३ असा विजय मिळवला.



पाकिस्तान हॉकी महासंघाच्या अंतरिम अध्यक्षांनी याप्रकरणाबाबत नाराजी व्यक्त केली. संघव्यवस्थापनाकडून त्यांनी स्पष्टीकरण मागितलं आहे. यामध्ये प्रमुख प्रशिक्षक ताहिर झमान, अन्य प्रशिक्षक रेहान बट, कामर इब्राहिम आणि उमर भुट्टा यांचा समावेश आहे.

पाचऐवजी सहा खेळाडू कसे खेळले या प्रश्नावर संघव्यवस्थापनाने सांगितलं की खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ यांच्यात समन्वय नसल्याने गोंधळ झाला. त्यातून ही चूक घडली. आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानवर अशी नामुष्की ओढवण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२२ पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत जपानविरुद्धच्या लढतीत पाकिस्तानचे १२ खेळाडू मैदानात होते. नियमानुसार ११ खेळाडूंनाच खेळता येतं. याप्रकारामुळे पाकिस्तानला गोल नाकारण्यात आला. पराभवामुळे पाकिस्तानला २०२३ हॉकी वर्ल्डकपसाठी पात्र होता आलं नाही. पाकिस्तान हॉकी महासंघाने, संघाचे तत्कालीन प्रशिक्षक ख्वाजा जुनैद यांच्यावर आजीवन बंदीची कारवाई केली होती. काही काळानंतर ही बंदी हटवण्यात आली.

### बॉक्सिंगमध्ये पाकिस्तानला पंच

# भारताचे तिघे उपांत्यपूर्व फेरीत

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताच्या तीन बॉक्सर्सनी आपापल्या लढती जिंकताना उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. यामध्ये जादुमणी सिंगने पाकिस्तानी प्रतिस्पर्ध्याला सहज नमवल्याने त्याची चर्चा अधिक आहे. त्याशिवाय अंकुश पंघाल, सचिन सिवाच यांनी आगेकूच केली.

एसईसी सेंटरमध्ये झालेल्या पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटातील राऊंड ऑफ १६ लढतीत जादुमणीने पाकिस्तानच्या सुमामा रहमानचा उत्कृष्ट तंत्र, वेग आणि



रिंगक्राफ्टच्या जोरावर ५-० असा फडशा पाडला. कारगिल विजय दिनानिमित्त हा विजय कारगिलच्या वीरांना समर्पित करत, सर्वांचा पराभव करून भारतासाठी सुवर्णपदक जिंकण्याचा मानस त्याने व्यक्त केला.

पहिल्या फेरीत प्रतिस्पर्ध्याचा अंदाज घेतल्यानंतर जादुमणीने सामन्यावर पूर्ण वर्चस्व मिळवले. दुसऱ्या फेरीत त्याच्याण कडक उजव्या हाताच्या ठोशाने पंचांना रहमानसाठी स्टँडिंग काऊंट द्यावा लागला. या विजयामुळे तो पदकापासून अवघा एक विजय दूर आहे. त्याशिवाय पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात २६ वर्षीय सचिनने सुरेख कामगिरी करत इंग्लंडच्या विल्यम ह्युईटवर ४-१ अशी मात केली. पाचपैकी चार पंचांनी सचिनच्या बाजूने २९-२७ असा निकाल दिला, तर एका पंचाने ह्युईटच्या बाजूने २९-२७ असे गुण दिले. सचिनने तिन्ही फेऱ्यांमध्ये सातत्यपूर्ण खेळ केला.

# सर्वेश कुशारेचा ग्लासगोमध्ये डंका

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

ग्लासगोमध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत नाशिकचा ३१ वर्षीय ॲथलिट सर्वेश कुशारे याने ऐतिहासिक कामगिरी करताना पुरुषांच्या उंच उडी प्रकारात रौप्य पदकाची कमाई केली.

उंच उडीमध्ये राष्ट्रीय विक्रमही नावावर असलेल्या सर्वेशने सोमवारी ग्लासगोमध्येही शानदार कामगिरी केली. त्याने २.२५ मीटरचे अंतर पार करताना रौप्यपदक जिंकले, तसेच जमैकाच्या रोमेन बेकफोर्डने सुवर्णपदकाला गवसणी घातली. तसेच इंग्लंडच्या जॅक किमानीने २.२० मीटर उंच उडी मारत कांस्य पदक जिंकले.



खरंतर कुशारे आणि बॅकफोर्ड या दोघांनीही २.२५ मीटरचा बार यशस्वीपणे पार केला होता. मात्र २.२८ मीटरचा बार पार करणं दोघांनांही जमलं नाही. मात्र काऊंटबॅकच्या नियमानुसार म्हणजेच बॅकफोर्डने पहिल्याच प्रयत्नात २.२५ मीटर अंतर पार केले होते.

पण सर्वेशला तिसरा प्रयत्न करावा लागला. त्यामुळे बॅकफोर्डला सुवर्णपदक, तर सर्वेशला रौप्य पदक देण्यात आले. या स्पर्धेत भारताचा आदर्श रामही सहभादी होता, जो २.१५ मीटर अंतर पार करू शकल्याने ५ व्या क्रमांकावर राहिला.

या स्पर्धेत सर्वेश आणि आदर्शसह तेजस्वीन शंकरही सहभागी झाला होता. तेजस्वीनने २०२२ राष्ट्रकुल स्पर्धेत कांस्य पदक जिंकले होते.

**वेस्ट इंडिजची आघाडी १५५ धावांपर्यंत** | **जस्टिन ग्रीव्हसचे सलग पाच निर्धाव षटकांत पाच बळी**

# पाकिस्तान संघाला वेस्ट इंडिजने केले नेस्तनाबूत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट हा असा खेळ आहे की, कधी काय होईल याचा नेम नाही. वेस्ट इंडिज आणि पाकिस्तान यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, वेगवान गोलंदाज जस्टिन ग्रीव्हसने आपल्या भेदक गोलंदाजीने इतिहास रचला.

पाकिस्तानविरुद्ध, जस्टिनने कसोटी क्रिकेटमध्ये यापूर्वी कधीही न झालेला विक्रम प्रस्थापित केला. आपल्या दुसऱ्या स्पेलमध्ये, जस्टिनने सलग पाच निर्धाव



षटके टाकली आणि प्रत्येक षटकात एक बळी घेतला. यामुळे तो सलग पाच निर्धाव षटकांमध्ये पाच बळी घेणारा जगातील पहिला गोलंदाज ठरला. सलग पाच निर्धाव षटके टाकण्यापूर्वी, ग्रीव्हसने एका निर्धाव षटकासह सहा षटकांमध्ये २७ धावा दिल्या होत्या आणि त्याला एकही बळी मिळाला नव्हता. मात्र, आपल्या दुसऱ्या स्पेलमध्ये तो पाकिस्तानी फलंदाजांसाठी विनाशकारी ठरला. यामुळेच, पहिल्या डावात चांगली सुरुवात करूनही, पाकिस्तानी संघ पत्त्यांच्या ढिगाऱ्याप्रमाणे कोसळला. पाकिस्तानविरुद्ध जस्टिन ग्रीव्हसच्या भेदक गोलंदाजीचा शान मसूद पहिला बळी ठरला. तो १०९ धावांवर फलंदाजी करत होता. जस्टिनने शान मसूदला बाद केले. त्याचा पुढचा बळी आमिर जमाल होता, जो फक्त ३ धावांवर बाद झाला. आमिरनंतर, त्याने पुढच्याच षटकात अली उस्मानला शून्यावर बाद केले.

त्याच्या पुढच्या षटकात, जस्टिनने १२ धावांवर फलंदाजी करत असलेल्या मोहम्मद रिझवानला बाद केले. त्याची पाचवी विकेट मोहम्मद अब्बासच्या रूपाने आली, जो एकही धाव करू शकला नाही. अशाप्रकारे, ग्रीव्हसने आपल्या दुसऱ्या स्पेलमधील पाचही षटकांत एकही धाव न देता प्रत्येकी एक विकेट घेतली. पाकिस्तानचा संघ एखाद्या पत्त्याच्या डावाप्रमाणे कोसळताना दिसला. तसंच जस्टिनने एक नवा रेकॉर्ड सेट केला आहे आणि त्याचा हा रेकॉर्ड नक्कीच क्रिकेटच्या सुवर्णाक्षरात लिहिला जाईल.

# तिहेरी पदकांसह वेटलिफ्टर्सचे वर्चस्व

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

ग्लासगो येथे सुरू असलेल्या २३व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सोमवारचा दिवस भारताच्या वेटलिफ्टर्सनी गाजवला. पुरुषांमध्ये मुथूपंडी राजा, तर महिलांमध्ये ज्ञानेश्वरी यादवने आपापल्या वजनी गटात रौप्यपदक काबिज केले. त्यानंतर रात्री १०च्या सुमारास महिलांमध्ये बिंद्याराणी देवीने कांस्यपदक जिंकून भारताच्या खात्यात दिवसातील तिसऱ्या पदकाची भर घातली.

भारताची एकूण पदकसंख्या आता ६ झाली असून यामध्ये १ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्यपदकांचा समावेश आहे. भारत पदकतालिकेत तूर्तास आठव्या स्थानी आहे.

भारताची २३ वर्षीय वेटलिफ्टर ज्ञानेश्वरीने महिलांच्या महिलांच्या ५३ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई करत भारताची पदकांची घोडदौड कायम राखली आहे. सोमवारी झालेल्या अत्यंत रोमहर्षक सामन्यात विक्रम मोडण्याच्या शर्यतीत तिने एकूण १९९ किलो (स्नॅच ८८ किलो + क्लीन अँड जर्क १११ किलो) वजन उचलून हे यश संपादन केले. नायजेरियाच्या ओमोलोला दिदिहने २०६ किलो (९३+११३) वजन उचलून राष्ट्रकुल व राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे नवे विक्रम प्रस्थापित करत सुवर्णपदक जिंकले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)